बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ८१
दुसरे खेपेस.... .......८१

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance,
Single copy ........................ 3

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 5 OCTOBER 1903 NO 39

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ५ माहे आक्टोबर सन १९०३ इ० अंक ३९

## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

---

त्वरा करा !!. अपूर्व लाभ !!!

अशी अमोल संधी
पुन्हा येणार नाहीं.

## श्री शनी प्रासादिक औषधालय कंपनी

### खामगांव आठवडे बाजार

खालीं लिहिलेली सर्व प्रकारचीं औषधें व पुस्तकें, संगीत नाटकें किफायतीनें मिळतील. ८१ आणा पाठवून क्याटलाग मागवा. पुष्कळ माल खपून सर्टीफिकेटेंही मिळाली आहेत. आह्मी खरे सोन्याची बक्षिसेंही देण्याची सोय ठेविली आहे. फक्त जानेवारीचे आंत घेणारास व पांच रुपयाचे वर घेणारास ¼ किंमत अगाऊ घेऊन बाकी राहिलेल्या किंमतीबद्दल व्ही. पी करूं. पांच रुपयाचे वर माल व्ही पीनें पाठविला जाणार नाहीं.

औषधाची यादी व किंमतः—

| | रु. आ. |
|---|---|
| डोळ्यांत अयरा फुलकोंब लाली असल्यास. १ डबी | १—० |
| गरमीचे चट्टयास मलम गुण तीन दिवसांत. डबी | १ |
| मद पडल्यास मलम डबी. | १ |
| गजकर्णास मलम डबी | ८४ |
| कान ठनकत असल्यास केसरादि अर्क बाटली | ०४ |
| कान फुटून पूं रक्त पाणी वहात असल्यास बाटली | ०४ |
| मुळव्याधीवर मलम डबीला | ०४ |
| डोक्यातील उवा नाहींशा करणाऱ्या अर्क बाटलीस | ८८ |
| जांघेंतील बद झाल्यास मलम डबी | १ |
| महामारीवर रामबाण १६ गोळ्यास | १ |
| प्लेगाची गाठीवर रामबाण मलम डबी | १ |
| तोंडावरलें मुरुम नाहींसे करणारे मलम डबी | ८८ |
| घरांतील उंदीर नाहींसे करणारे औषध तोळयास | ०४ |
| घरांतील ढेंकूण बंद करणारे औषध तोळ्यास | ०४ |
| दंतमंजन डबीला | ८४ |
| विंचू उतरण्यास अर्ध्या तासांत गुण मुळीस | १ |
| हिवावर १६ गोळयास रु. | १ |
| काळ्या रंगाचा गोरा रंग करणारें तेल बाटलीस | १ |

हीं वरील सर्व औषधें खालील पत्यावर मिळतील. उत्तराकरितां टिकीट अर्ध्या आण्याचें पाठविलें पाहिजे त्यावाचून उत्तर मिळणार नाहीं.

**पत्ता—दयालदास मोतीदास झेंडे म्यानेजर—श्री शनी प्रासादिक कंपनी. आठवडे बाजार. खामगांव ( वऱ्हाड )**

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० यवतमाळास यंदा पुष्कळ पाऊस झाला आहे. विहिरींना इतकें पाणी झालें आहे कीं दोर न लावता हातानें पाणी भरून घेता येतें. यावरून मागील सालाची भरती करून देण्याचा मेघराजाचा हेतु दिसतो.

हरी कितनावर बरीच सध्या मंडळीची झोड आहे.

रा० रा० द्रवीड एम. ए. यानीं ए. व्ही. स्कुलांतील मुलाना दर शनिवारीं दोन प्रहरीं ३॥ ते ४॥ पर्यंत " डोम्यास्टिक एकानमी " यांतील शास्त्रीय विषय मराठींत नीट समजावून देण्याचें काम हातीं घेतलें आहे. पावसाळ्यामुळें ह्माना फुरसत मिळते तितक्याचा उपयोग ते करून दाखवितात. रविवारीं तिसरे प्रहरीं छत्रदर्येंं गीतेचे श्लोक वाचून अर्थ सांगतात सदर्हू ग्रहस्थ फार साधे राहतात. चोहिकडे अशा मनुष्यांचीच जरूर आहे. " सनातनधर्म " या विषया बद्दल चर्चा करण्यारतव संस्था स्थापना करण्याविषयीं तेथील मंडळीचा विचार चलूं आहे.

यवतमाळ हे पूर्वीं यवत या नांवा खालीं मोडत होतें. परंतु हल्लीं या ठिकाणीं सर्व सुधारणा झाल्यामुळें यवतमाळ हें नांव चांगलें शोभतें. सुधारणा ह्मणजे जिल्ह्याचें मुख्य ठिकाण यामुळें कचेऱ्या वाढल्या, लोकवस्ती वाढली, ह्मणून गांव वाढलें. पुढें कारखानें जीन प्रेस सुरूं झालें. मोठमोठे वकील येऊन राहिले. पुस्तकालय, क्लब वगैरे संस्था झाल्या. सामाजिक सुधारणा बऱ्याच दिसतात धार्मिक सुधारणा होऊं पाहतात. नाटकें तमाशे वगैरे यांना चांगला आश्रय मिळतो वगैरे वगैरे गोष्टी होत. कळावें.

आपला
स्नेही

---

## स्वदेशी आगपेटीचा कारखाना

वणी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण जें यवतमाळ त्या ठिकाणीं हल्लीं यंदा आगपेट्या करण्याचा कारखाना सुरूं झाला आहे. त्याज बद्दल आज थोडी माहिती खाली देतों ती येणें प्रमाणें:—

रा० रा० द्रविड एम्. ए. यांनीं जीन व प्रेस काढलीं आहेत. ते जिनची व्यवस्था स्वतः पाहतात. हे पूर्वीं पुणें येथील महाराष्ट्र कालेजांत प्रोफेसर होते. हल्लीं कारखानदार आहेत. याचे स्नेही रा गोखले आहेत. ते जपान वगैरे वेडून जाऊन आले आहेत. त्यांनीं एक असाच कारखाना बडोदें सरकारचे प्रांतांत काढला आहे. बडोदे सरकारांनीं बऱ्याच सवलती व मदत दिली आहे. त्यांच्याच मदतीनें रा० रा० द्रविड यांनीं हा कारखाना उत्पन्न केला आहे.

या कारखान्यातील सर्व यंत्रें यवतमाळास हातांनीं तयार केलीं आहेत. परकीय यंत्राची मदत लागली नाहीं. सालईचें लांकूड काड्या साठीं व पेट्यासाठीं फार उपयोगी पडतें. काम जें रा० द्रविड करून घेतात तें मुलाकडून फार चांगलें होतें असा त्यांचा अनुभव आहे. या साठीं त्यांनीं दोन पोरकी मुलें संभाळलीं आहेत. जो कोणी आपलीं मुलें त्यांचे कडे पाठवील त्यांची ते सर्व तऱ्हेनें जोपासना करण्यास तयार आहेत.

कोटा बिलासपुर येथील पेट्या प्रमाणेंच पावसाळयांत पेटणार नाहीत असा रंग होता परंतु वस्तु स्थिति निराळी आहे. अद्याप विक्रीस भरपूर माल पुरवठा करण्या पुरता तयार नाहीं याचें कारण पावसाळ्यामुळें सालईचें लाकुड ओलें मिळतें तें ओलसर असल्यानें काडी पेट घेत नाहीं. या शिवाय जमीन वगैरे सर्व ओलसरच आहे त्यामुळें माल वाळलेला तयार होणें कठीण आहे. यापुढें मात्र सर्व व्यवस्था नीट करणार आहेत. पहिलेंच वर्ष, नवीन कारखाना पावसाळ्याचे दिवस, ह्मणून एकदम सर्व कसें जमावें.

मुलें जीं कामास पाहिजेत तीं सात, आठ नऊ वर्षांवरील असल्यास चांगलें आहे. अशा कारखान्यांत लोक शिकावयास जातील तर बरें. कामही कठीण नाहीं. हल्लीं जीं दोन मुलें काम करितात त्या वरून असें वाटतें कीं जर रा. द्रविड यांना दहा पंधरा मुलें अशीं मिळालीं तर फार चांगला कारखाना चालेल.

प्रथम लांकडाचे तुकडे करितात, नंतर वाफेंत पातळ पत्रें तयार होण्यापुरतें लांकूड मऊ करितात. तें झाल्यावर काड्या तयार करण्याचे पत्रे व पेट्या तयार करण्याचे पत्रे निराळे तयार करितात. कारण काड्या जाड असतात. पेटीचा पत्रा काड्यापेक्षां पातळ असतो. त्यांच्यासाठीं लांकडी यंत्रें तयार केलीं आहेत. नंतर काड्या एका चाळणींत घालतात. त्या चाळण्याचा हेतू असा कीं ढिसूळ वगैरे मोडक्या काड्या पडून जातात व चांगल्या काड्या एका ओळीनेंच जमतात. त्या चाळणींत लहान खण आहेत. ते काडीच्याच बेताचेच आहेत. नंतर मुलें काड्या घेऊन जसे छापखान्यांत खिळे जोडून मोठ्या पत्र्याच्या आकाराच्या स्टिका जमवितात त्याप्रमाणें काड्या खोचून तक्ते तयार करतात. असे तक्ते शेंकडों तयार करतात. नंतर एका टेबलावर सर्व काड्या सारख्या सपाटीवर आल्यात किंवा नाहीं ते पाहून कमजास्त असल्यास सारख्या करतात मग गंधकाचा रस तयार केला असतो त्या भांड्यावर एका मागून एक असे तक्ते बुडवितात ह्मणजे काड्यांची टोकें गंधकांत बुडवितात व शेवटीं लाल गुल जो असतो तो रस निराळ्या भांड्यांत असतो त्यामध्यें काड्यांचीं टोंकें बुडवितात व वाळण्या करितां ठेवितात नंतर सर्व काड्या काढून घेऊन पेट्यांत भरूं लागतात.

सेफ्टी म्याचेस तयार करण्याची रा० रा० द्रवीड यांची इच्छा आहे व ते त्यामध्यें यश मिळवितील अशीं उमेद आहे. यापुढें दुकानदारांनीं यवतमाळाहून विक्रीसाठीं आगपेट्या मागवाव्यात अशी आमची सूचना आहे.

सदर्हु कारखान्यांतील पेटी आह्मी पाहिली आहे. त्यांच्याकडून आह्मास एक पाहण्यास्तव आली आहे त्यावरून त्याना यश मिळेल अशी पूर्ण आशा आहे.

---

## कर्मयोग.

( रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांचा निबंध ) नं. २

ई वर सांगितलेल्या तीन्ही मार्गांपैकीं कोणत्याही एका मार्गात वर्त्तन ठेवल्यास सृष्टीच्या उत्पत्तीस कारणभूत असलेल्या सत्व, रज, आणि तम या तीन गुणांच्या प्रभावानें उत्पन्न होणाऱ्या भ्रमाचा नाश होतो. मनुष्याचे डोळ्यावर अज्ञानाची झापड पडते ती याच गुणामुळे होय. अशा झापडीमुळें आत्म्याचें दर्शन होत नाहीं. हा अज्ञानाचा पडदा निघाला कीं सत्य स्वरूपाचें ज्ञान होतें. या मार्गांनीं वर्त्तन करित असतां याच त्रिगुणांच्या साह्यानें त्यांच्या तावडीतून मनुष्य सुटतो. या मार्गाच्या अवलंबनानें आत्मानात्म विचार कळतो, इंद्रियें आणि मन आपआपल्या विषयांकडे धाव घेतात त्यांशीं आत्म्याचा कांहीं संबंध नाहीं हें समजतें व नंतर तो मनुष्य गुणातीत होऊन, गुणांच्या पड-

ज्यानें झांकलेला शुद्ध आत्मा, तो पडदा दूर झाल्यामुळें त्यास स्पष्ट दिसूं लागतो.

७ एथपर्यंत आपण हातीं घेतलेल्या विषयाची प्रस्तावना झाली. आतां मूळविषयाचें विवेचन करण्यास आरंभ करूं. तो विषय "कर्म मार्ग" होय. सर्व मनुष्यसमाज या मार्गांतच आहे परंतु ह्या मार्गाचें आचरण कोणत्या रीतीनें केलें असता फायदेशीर होईल किंवा याचा हेतु काय हें जाणून त्या मार्गाचें आचरण करणारे लोक फारच थोडे; प्रायशः सर्व मनुष्यसमाज न जाणतांच वागत आहे असें ह्मटलें तरी चालेल. हल्लीच्या मनुष्यसमाजाचे प्रकृत स्थितीचा ऐतिहासिकदृष्ट्या आपण विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं, हा कर्ममार्ग मनुष्यास अनेक प्रकारची कर्मे करण्यास लावितो, याचे प्रभावानें मनुष्य हरएक प्रकारच्या वस्तूंच्या मागें धांवतो, बाह्य सृष्टींपासून तृप्ति मिळविण्या करितो अव्याहत परिश्रम करितो, कितीही विषयप्राप्ति झाली तरी आणखी पाहिजेच असें त्यास वाटत असते व ह्मणून ज्यास्त प्राप्ती करितां त्याची तरफड चालूच असते. त्याची खटपट वाढत्या प्रमाणावर असते. व अशा रीतीनें कर्म करण्यांत तो चूर असतो व तसें वागतांना "मला सुख होतें" "मला दुःख होतें" वगैरे उद्गार काढितो. पण त्या बिचाऱ्यास माहित नसतें कीं हें त्यास जें वाटतें तें प्रकृतीचें कर्तृत्व आहे, व आत्मा सुखदुःखातीत आहे. सुरुवातीला मनुष्य कर्म करितो तें फळाचे आशेनें करितो, कारण विषयांचा उपभोग घेण्याची त्यास उत्कट इच्छा असते. क्षणभर तो रिकामा बसला कीं त्यास करमेनासें होतें व तो तरफड करूं लागतो. अशा रीतीनें कांहीं न करितां स्तब्ध राहत गेला तर त्यानें शरीराचाही नाश होईल. या करितां निद्रा, आलस्य आणि प्रमाद हे जिंकले पाहिजेत व त्यांस अगदीं ताब्यांत ठेविलें पाहिजे. वर सांगितलेले तिन्ही धर्म तमो गुणाचे होत. एवंच सत्त्व, रज आणि तम या तीन गुणा पैकीं तमो गुण जिंकण्याची प्रथम तजवीज केली पाहिजे. समाजांतील सामान्य लोकांकडे पहा बरें! उच्च प्रतीच्या हेतूंचा गंध तरी त्यांच्यांत आहे काय? बुद्धिगत आनंद ह्मणजे काय व तो कसा असतो याची कल्पना तरी त्यांस होते काय! अशा स्थितींत परमार्था विषयीं तर बोलावयास नको, ते तमोगुणांत डूब झालेले दिसतात व त्या अज्ञानांतच इतके खुष असतात कीं त्यांतून काढण्याचा कोणी यत्न केला तर तें त्यांस बरें वाटत नाहीं. उदाहरणार्थ एखादा खेड्यांतील कुणबी घ्या. करमणूकी करितां तुणतुणें घेऊन अश्लील गाणीं ह्मणत बसला असतांना त्यास जर ह्मटलें कीं "दादा यांत काय अर्थ आहे. यापासून उलट तुमचें नुकसान आहे. गाणेंच ह्मणावयाचें असेल तर नीतिपर अशी संत लोकांचीं पदें आहेत तीं कां ह्मणत नाहीं. त्यांत मोठी मजा आहे" त्यास तो कुणबी काय उत्तर देईल बरें! तो ह्मणेल "शास्तरी बोवा तुमची शास्त्रांतली वांगीं शास्तरांतच ठेवा, आह्माला आज काय करावें लागतें. अह्माला आमच्या ला [illegible] वाटतात" असो. अशा अज्ञ लोकांस कसें दुरुस्त करावें हा प्रश्न येथें उद्भवतो. स्वस्थ बसण्यापेक्षां कांहीं तरी करणें बरें. मग ते भलत्या मार्गाचें कां असेना. कांहीं तरी हाल चाल असणें अगदी आवश्यक आहे. मनुष्याच्या उन्नतीस कर्माची तर जरूरी आहे. त्याची सुरुवात कशी होते तें आतां पाहूं. सुरुवातीला मनुष्य कर्म करण्यास प्रवृत होतो तो केवळ पशू सारखा आपल्या इंद्रियांची तृप्ति करण्या करितां होतो. कर्म प्रवृत्ती करण्या करितां हा मायेचा पहिला चाबुक होय. वासने करितां कर्म प्रवृत्ति होते, ह्मणून प्रत्येक असा मनुष्य वासनांची तृप्ति होण्याकरितां जें कर्म करणें जरूर आहे तें करण्यास प्रवृत्त होतो. प्रथमतः त्या वासना कनिष्ठ प्रतीच्याच असणार. तदर्थ कर्म करीत गेला ह्मणजे त्या वासना वाईट आहेत व आपल्याला योग्य नाहींत असें त्यास कालांतरानें वाटूं लागतें. पण प्रथम तर त्याच्या उन्नतीस त्या कारणभूत होत तच. कारण तमोगुणांच्या प्राबल्यामुळें प्रारंभीं तो कांहींच न करितां स्तब्ध राहत असे. तो तमोगुण, नीच प्रतीचा कां असेना पण तशा कर्माचरणामुळें हळूं हळूं नाहींसा होत जातो. ऐंद्रिक वासनांची तृप्ति करण्याकरितां (अर्थात् हें सुख कमी दर्जाचें आहे हें सांगणें नको) तो कर्म करण्यास लागतो त्यामुळें त्याची उन्नति होते हें स्पष्ट सिद्ध झालें. वरील वर्तन दुर्गुणांतच गणलें जातें तथापि त्याची ही आवश्यकता एका वेळीं आहे हें उघड दिसून येतें. याच अर्थानें भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत ह्मटलें आहे:—

द्यूतं छलयतामस्मि

८ वर सांगितल्या प्रमाणें कांहीं काळ पर्यंत कर्माचरण करीत गेलें असतां, पूर्वीच्या फळाच्या इच्छेनें मनुष्य कर्म करीत होता त्याहून उच्च प्रतीच्या फळाच्या आशेनें तो कर्म करूं लागतो. या उच्च प्रतीच्या कर्माचरणामुळें त्या मनुष्यांत रजोगुणाचें प्रमाण वाढत जातें. कर्म करण्याकडे तो पहिल्या पेक्षां जास्त उद्युक्त होतो व चहूंकडे धांवपळ करूं लागतो. त्याच्यांत जास्त उल्हास उत्पन्न होतो. तो हळूं हळूं इतका वाढतो कीं आपल्या इंद्रियांची तृप्ति करण्या करितां वाटेल तशी बरी वाईट खटपट तो करितो, ऐंद्रिकसुख दोन प्रकारचें असूं शकतें; ऐहिक अथवा पारलौकिक. शेंकडो वर्षांचे पूर्वींच्या वस्तुस्थितीकडे आपण नजर फेंकिली तर आपणास असें दिसून येईल कीं, त्या वेळचे लोक ऐहिक सौख्याची विशेष महती समजत नव्हते, त्यांनवर धर्माचें विशेष बंधन होतें व आत्म्याचे अमरत्वा विषयीं त्यांचे मनांत पूर्ण उमज होता—वाचक हो "उमज" ह्या शब्दाकडे विशेष लक्ष द्यावें अशीं विनंती आहे. "समज" शब्दाच्या अर्थाहून निराळ्या अर्थानें, उमज या शब्दाचा उपयोग केला आहे, या शब्दानें असें सुचविलें जात आहे कीं आत्मा अमर आहे असें ते लोक नुसतें तोंडानें बडबडत नव्हते परंतु या तत्वाचा त्यांचे मनावर एवढा पगडा असे कीं ऐहिक सुखाची परवा न करितां निवंतपणी केलेल्या सत्कर्माच्या फळाचा उपभोग घेण्या-वर स्वर्ग लोकीं आपण भोगूं अशा हेतूनें ते या जगांत वागत होते हें पूर्व इतिहास वाचला असतां आपणास सहज कळून येईल. त्यांची कर्मप्रवृत्ति रजोगुणामुळें होती, फळाशेनें होती, थोडें देऊन पुष्कळ मिळविण्याची त्यांस आशा होती, व याच प्रकारचें आणखी ही त्यांचें वर्तन होतें ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्यांच्या संबंधानें एक महत्वाची गोष्ट आपणा सर्वांस कबूल करणें भाग पडेल. ती ही कीं केवळ ऐहिक ह्मणजे पांच भौतिक सुखावर आसक्ति न ठेवितां मरणानंतर परलोकीं सुखोपभोगाची उमेद ठेवित होते.

९ बरें, हल्लींच्या वस्तुस्थितीकडे आपण पाहूं गेलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं ज्या फळाच्या हेतूनें मनुष्य अत्यंत श्रमानें कर्माचरण करितात तें फळ याच लोकीं मिळविण्याचा त्यांचा उद्देश असतो. पांच भौतिक विषयांचे प्राप्तीकडेसच त्यांचा नेहमीं यत्न असतो. हा प्रकार पाश्चिमात्यांत विशेषचें दृष्टीस पडतो हें खरें, तथापि आपल्या देशांत तसा प्रकार नाहीं, असें कोणीही समजूं नये. या वेडाचें बीज आह्मांत पेरलें गेलें आहे व त्याचा फैलाव ही वाढत्या प्रमाणावर होत आला आहे. असो, आतां आपण जरा पाश्चिमात्याकडे वळूं.

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध १४ शके १८२५

## विद्याखातें

(प्राथमिक शिक्षण)

या प्रांताचा विस्तार साडे सतरा हजार चौरस मैल आहे; आणि या एवढ्या क्षेत्रफळावर साडे सत्तावीस लक्ष लोकवस्ती आहे. ज्या गांवीं लोकसंख्या पांच हजारा पेक्षां कमी आहे त्या गांवाला खेड्यांत गणतात आणि जेथें पांच हजाराहून अधीक वस्ती आहे त्या गांवाला शहरांत धरतात. या प्रांतांत ४४ शहरें व ५७१० खेडेगांव आहेत. शहर गांवाला व खेडेगांवाला मिळून ११७८ शाळा आहेत त्या पैकीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळा ११३४ आहेत आणि बाकीच्या शाळांमध्यें ३ हायस्कूलें, मिडल स्कूलें, १ ट्रेनिंग कालेज, ३ औद्योगिक शाळा वगैरेंचा समावेश होतो. सदरहू ११३४ प्राथमिक शाळा पैकीं ५६९ जिल्हा बोर्डाच्या शाळा व ४७ मुनसिपालिट्यांच्या शाळा आहेत. त्या शिवाय सरकारी देणगी मिळते अशा ४५४ खानगी शाळा असून ६४ शाळा खानगी असून त्यांला सरकारी मदत कांहींच मिळत नसते. वरील आंकड्यावरून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार फार कमी आहे असें दिसून येईल.

असा साधारण नियम आढळतो कीं १०० माणसें घेतलीं तर त्या पैकीं शाळेला जाण्यासारखीं मुलें व मुली मिळून १५ असतात. या मानानें या प्रांताच्या २७॥ लक्ष लोकवस्ती पैकीं ४ लक्ष मनुष्यें शाळेला जाण्यासारखीं निघतील. विद्यार्जनाच्या वयांत असलेल्या चार लक्ष मुलामुली पैकीं निम्में प्रमाण पुरुषांचें धरलें तर दोन लक्ष विद्यार्थी आमच्या शाळांतून शिकावयाला यावयास पाहिजे होते. परंतु एकंदर ९१ हजार विद्यार्थी शाळेंत गेल्या वर्षी शिकत होते. जितके विद्यार्थी तितक्याच विद्यार्थिणी मुलींच्या शाळांतून असावयाला पाहिजे होत्या. पण मुलींची संख्या तर अगदींच कमी ह्मणजे फक्त ३००० आहे. विद्यार्थी दरशेंकड्या १०० मुली घेतल्या तर त्यापैकीं फक्त १ मुलगी शाळेला जाणारी निघते. आह्मी वर जी संख्या दिली आहे तिच्यमध्यें हायस्कुलांतून, मिडलस्कुलांतून ट्रेनिंगांतून व यंत्रालयांतून शिकणाऱ्या चार हजार विद्यार्थ्यांचा समावेश होतो हे विसरण्या सारखें नाहीं. आमच्या प्रांतांत काय पण सर्व इंडियांत देशील प्राथमिक शिक्षणाची मोठीच आवश्यकता आहे. साधारण लिहितां वाचतां येणें व किरकोळ व्यवहारिक गणित येणें या गोष्टी फार महत्वाच्या आहेत. अलिकडे विद्येचा प्रसार झाला आहे असें ह्मणतात पण प्राथमिक शिक्षणाचा फैलाव इतका थोडा आहे कीं विद्यादानाचें कर्तव्य सरकारानें एक चतुर्थांश इतकें देखील अजून बजावलें नाहीं असें कष्टानें ह्मणावें लागतें. प्राथमिक शिक्षणाची बाजु सरकारानें उचलली आहे आणि त्या शिक्षणाकडे संपूर्ण लक्ष देण्यासाठीं सरकार उच्च शिक्षणाकडील आपला हात काढून घेण्याच्या खटाटोपांत आहे तरी देखील प्राथमिक शिक्षणाची हल्लींची अत्युच्च परमावधी ह्मणजे पुरुषा संबंधानें एक चतुर्थांश इतकी मजल अजवी पोचली आहे आणि स्त्री शिक्षणा संबंधानें नुकतांच कोठें श्रीगणेशा पहिला धडा घालून देण्यांत आला आहे. वऱ्हाडांत अजून ७०० खेडेगांवें अशीं आहेत कीं तेथें लोकवस्ती ५०० हून अधीक आहे पण तेथें एकही प्राथमिक शाळा नाहीं. ही स्थिती आह्मास फार शोचनीय वाटते. साधारण लिहिणें, वाचणें व गणित हीं सर्वांसच आलीं पाहिजेत. अक्षरशत्रु जनसमूहाला चार अक्षरें टफ करिता येण्या पुरतें शिकविण्याची जबाबदारी सरकारावर आहे. आमच्या मतें प्राथमिक शिक्षणाची जबरदस्ती कायद्यानें सर्वांवर केली पाहिजे; आणि त्या कामासाठीं जो खर्च येईल त्याचें फळ शेंकडोपटीनें सरकारांला नानाविध रितींनीं परत मिळेल असा आह्मांस पक्का भरंवसा आहे.

मुलींच्या शाळांकडे मे. क्यांडी साहेबांचें लक्ष्य विशेष आहे. त्यांनीं एक सूचना अशी केली आहे कीं मुलींच्या शाळांकडील खर्च सरकारी ऐन वसूलांतून देण्यांत यावा आणि ही सुचना मंजूर करण्यांत येईल तर मुलींच्या शाळा कडील प्रस्तुतचा खर्च मुलांच्या शाळा नवीन घालण्याकडे आणि सध्यां ज्या शाळा आहेत त्या सुधारण्याकडे लावण्यांत येईल. जिल्हा बोर्डे व मुनिसीपालिट्या या संस्थाकडे प्राथमिक शाळा सोंपविल्या आहेत पण त्या योग्य प्रकारें चालविण्यासाठीं लागणारा खर्च भागविण्याचें सामर्थ्य या संस्थांस नाहीं हें

आमचे डायरेक्टर साहेब पक्के ओळखून आहेत आणि या बाबतींत ते पुष्कळदां आपल्या रिपोर्टांत उल्लेख करीत असतात परंतु खर्चाची गोष्ट कोणीही काढली तर सरकारी कानाला बधीरपणा येतो हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय ! प्राथमिक शिक्षणाकडे हल्लींचा खर्च १ लक्ष २२ हजार २१३ रुपये आहे.

---

राव साहेब देवराव विनायक ह्यांच्या देखरेखी खालीं असलेली येथील नेटिव्ह कॉटन जिनिंग आणि स्पिनिंग कंपनी नुकतीच कंपनीच्या कायद्या प्रमाणें नोंदण्यांत आली आहे. त्या कंपनीचा गेल्या सालचा वार्षिक रिपोर्ट भागीदारांच्या सभेपुढें गेल्या रविवारीं सादर करण्यांत आला. ह्या कंपनीचें अध्यक्षत्व राव साहेब देवराव ह्यांजकडे प्रथम पासून आहेत. ह्या कंपनीस आज जी उर्जितावस्था प्राप्त झाली आहे तिचें सर्वांशी म्हटलें नाहीं तरी बहुतेक श्रेय राव साहेब ह्यांजकडेस आहे ह्याबद्दल संशय नाहीं. राव साहेबांनीं आपल्या उदाहरणानें पांढरपेशे लोक कारखान्यांतून कसे उदयास येतील हें जगास सिद्ध करून दाखविलें आहे. गेल्या वर्षी विजयादशमीच्या मुहूर्तानें सूत कातण्याच्या कारखान्याचा पाया सदर्हू कंपनीनें घातला तरी वर्ष अखेरीपूर्वी सुताचा कारखाना सुरू करण्यात आला नव्हता. ह्यामुळें गेल्या सालीं झालेला नफा कापूस वटणे व त्याच्या गांठी बांधणें ह्या पासूनच झाला आहे. गेल्या सालीं कंपनीस जो निव्वळ नफा राहिला त्यांतून दरमहा दर शेकडा १४ आणे प्रमाणें भागिदारांस त्यांच्या शेअरांवर नफा वाटण्याचें ठरलें. सदर्हू भागीदारांच्या सभेंत जे ठराव पसार झाले त्यांचा साराश आमचे मित्र शुद्धवऱ्हाडीकर्ते ह्यांनीं पूर्वीच दिला आहे. परंतु कदाचित् विस्मृतीमुळें त्यांजकडून एका महत्वाच्या ठरावा विषयीं उल्लेख करण्याचें राहिलें असेल ह्या मुळें आह्मी सर्व लोकांच्या माहिती साठीं त्याचा उल्लेख करितों. गत वर्षाच्या हिशोबाचा जो आढावा कंपनीच्या डायरेक्टरांनीं भागिदारांच्या सभेस सादर केला होता त्यात गतसालीं उत्पन्न काय झालें किंवा खर्च काय झाला किंवा उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी कोणत्या होत्या ह्या विषयीं उल्लेख केला नसून कंपनीची साल अखेरीस स्थिती काय होती एवढ्या संबंधानें मात्र उल्लेख केला होता. ह्या आढाव्यावरून ता० ३१ जुलै सन १९०३ रोजीं कंपनीस कर्ज किती आहे किंवा कंपनीत लोकांकडून येणें किती आहे ह्या संबंधाची संपूर्ण माहिती भागीदारांस मिळेल ही गोष्ट खरी, परंतु गेल्या वर्षी कंपनीचा खर्च किती झाला किंवा तिला उत्पन्न काय झालें त्याचप्रमाणें एकंदर नफ्याशीं खर्चाचें प्रमाण काय पडतें ह्या संबंधानें भागीदारांस कांहीं बोध होणार नाहीं असें किसेक भागीदारांचें मत असल्यावरून त्यांनीं सदर्हु माहिती भागीदारांना सदर्हू आढाव्या बरोबर देण्यांत यावी अशी सूचना केली. त्यावेळीं "आढावा" शब्दाच्या व्याख्येवर बरीच मतें न मतें होऊन व दुसऱ्या कंपन्या सुद्धां आपल्या आढाव्या बरोबर अशाच तऱ्हेची माहिती देत असतात ह्या गोष्टीचा विचार होऊन सदर्हू सुचना सर्वानुमतें मान्य करण्यांत येऊन त्या प्रमाणें ठराव पसार करण्यांत आला. अशा तऱ्हेची माहिती प्रसिद्ध केल्यानें डायरेक्टर्स खर्च कमी करून उत्पन्न किती वाढवितात ह्या संबंधाची माहिती सर्व भागीदारांस मिळेल. व या योगानें डायरेक्टरांचें काम स्पष्ट रीतीनें भागीदारांच्या नजरेस येईल ही समाधानाची गोष्ट होय.

---

# The Berar Samachar

**MONDAY OCTOBER 5 1903**

The controversy between the Hon. Mr. Lely and the Hon. Mr. P. M. Mehta about the respective duties of the Educated Natives and the Government has, fortunately for both the opponents, cleared the debatable ground a good deal; and both of them should now shake hands and thank each other for the good will shown by each towards the other. "All's well that ends well." The Hon. Mr. Lely who has already afforded ample testimony about his sympathy for the regeneration of the industries in India, by the active help he gave to the last Industrial Exhibition held at Ahmedabad, is surely no enemy of the Educated natives of India. Similarly the Hon. Mr. Mehta who has been the member of the Bombay Municipal corporation for the past twenty five years or so and who has been helping the cause of the Government in and out side the Legislative Councils, is no enemy of the Government. Either of them when attacking the opposite side, is actuated by a good motive to remove the defects in the other side. Mr. Mehta represents the type of an Educated native: and his opinions upon the Government policy, should fairly be considered to represent the opinions of other educated natives in this country. Bishop Macarthur who has been recently promoted to the Bishopric of Southampton, said as follows about the aspirations of Educated natives of India:—" The craving for independence, for liberty, for recovered nationality, for powers and opportunities of self government according to indigenous views and instincts, corresponds very closely to the ruling passions in the hearts of the Jews. It is not indeed diffused among the people to the same extent.......But among the educated ......the craving is deep and strong. It explains the restlessness which is observable on the surface of Indian life, the discontent, the fretfulness, the disposition to criticise, the tone of bitterness, the temper of suspicion and seeming unfriendliness. It is easy to mistake the significance of these things, to interpret them as evidences of a seditious spirit, and an attitude of disloyalty to Government. I am convinced that they mean no such thing." Of course mere good intentions for the good of the people will not avail either party. They must be backed by earnest efforts on the part of either party to realise the good intentions. As the path to be taken by the educated is an untrodden one the educated people are sure to commit mistakes; & the other side is perfectly justified in pointing them out with a view to correct them. Just as the educated people expect the Government to receive the criticism coolly they in their turn should never be intolerant of criticism but should accept it as men, emanating as it does from a pure motive from the opposite side. If the educated natives and the Government officers in this country cooperate and work for the good of the country then only they will be able to accomplish much by their combined efforts. It need not be said that their combined efforts are essential for the regeneration of India. Fortunately for both, the sad death of our beloved Queen, and the famine and plague which have been ravaging this land successively have opened out a good sphere for public action which is sure to be utilized by them both. The Local Self Government Scheme which has been fortunately introduced amongst us since a long time, though not in its full form, still affords a good scope for the joint action of both the Educated men and the Goverument officers who have the good of the country at heart. Let us therefore hope and pray that the points at issue urged in this controversy by each of these opponents who may now fairly be considered to have become friends, will guide both the parties and bring them together for the common good of the country.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान—हस्तनक्षत्राचा पाऊस पुष्कळ झाला पण त्याची ती हत्ती सारखा दगडफोड, वेगवान, व स्वल्पकालीन असा पाऊस झाला नाहीं. सार्वजनिक आरोग्याला बाधक असे प्लेग, हिंवताप, वगैरे आजार चालू आहेत.

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असि० कमिशनर यवतमाळ हे किरकोळ रजेवर अमडापुरास गेले होते ते परत यवतमाळास दाखल झाले.

मि. एदलजी जमशेटजी संजाना पेनशनदार असि० कमिशनर यांस भावनगर संस्थानांत मुख्य प्रधानांच्या सेक्रेटरीची जागा मिळाल्या अन्वयें; ते भावनगरास गेले आहेत. राजश्री भाईसाहेब यांचें अभिनंदन करून त्यांस अशी मोठी हुद्देदारी लवकरच मिळो असें आह्मी इच्छितों.

उमरावतीला प्लेगाचा धडाका रोज ४७। ६३,५९ माणसावर उडतो, आकोटाला देखील २०।२५ पर्यंत मृत्यूंचें दररोजचें मान चालूं आहे. आकोल्यास सध्यां प्लेग नमला आहे.

या प्लेगाच्या वेळीं गरीब लोकांस झोंपडी वगैरे संबंधानें मदत देण्यासाठीं वर्गणी गोळा करण्या करितां गेल्या मंगळवारीं येथील टाऊनहालांत जाहिरसभा भरली होती. अध्यक्षस्थानीं रा० रा० रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर हे होते. सभेला पंचवीस तीस गृहस्थ आले होते. अध्यक्षांनीं २५ रुपयांचा आंकडा टाकला; आणि बाकीचे आंकडे याच्या खालचे होते. या सभेला मारवाडी व्यापारी ह्मणून कोणी नव्हते. फक्त एक गुमास्ता ब्राह्मण राजश्री लक्ष्मीनारायण होता त्यानें २० रुपयांचा आंकडा दिला. रावबहादूर भागवत १५, रावबहादूर बापट ५ व बाकींचे इतर राजश्री यांनीं बेतावताचेच आंकडे टाकले. या कार्याला सरकारानें आपल्या ऐन काळींतून मोठीशी वर्गणी दिली पाहिजे असें आह्मी ह्मणतो.

नामदार चिफ कमिशनर हे उद्यां दिवसाच्या गाडीनें उमरावतीस जाणार आहेत आणि इलिचपूर, यवतमाळ वगैरे कडे जाऊन परत १३ वे तारखेला आकोल्यास येतील यांच्या सन्मानासाठीं येथील मुनसिपालिटी चांगला खर्च करून साहेब बहादूरांचें स्वागत उत्कृष्ठ करणार आहे.

मोजणी शिकविण्याच्या पटवारी वर्गांतील चालूं महिन्यांत ४२ उमेदवारांपैकीं २६ पसार झाले.

प्लेगग्रस्त भागांतून पक्षकार व साक्षीदार लोकांस होतां होईपर्यंत बोलावूं नये असा हुकूम दिवाणी कोर्टास देण्यांत आला आहे.

रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांनीं ८ महिन्यांची फर्लो रजा घेतल्या कारणानें त्यांच्या बुलढाण्याच्या डिपुटी इनस्पेक्टरीवर रा. रा. दामोदर कृष्ण टिळक, हेडमास्तर, देऊळगांव राजा यांस बढती देण्यांत आली हे कळविण्यास आनंद वाटतो.

हास्पिटल असिस्टंट तयार करण्याचा वर्ग हैदराबादेस होता तो यापुढें मध्यप्रांतांतील पाटणा येथील वर्गास जोडण्यांत येईल.

---

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८-॥ |
| सोनें २४॥ | | चांदी ७१। |
| जवारी ३०।३६।४० | | जवस ९० |
| गहूं | | ७६ ते ९६ |
| बाजरी | | ४६ |
| मीठ | ४।ड | रु. मण |
| चणे | ३८ड | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ५। | रु. मण |
| रुई | | ९० |

---

किं० दिवाणी दावा नंबर ८ क्लास २१ १९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा. आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान गोपाळ वामन बापट साहेब बहादूर सिव्हील जडज्य आकोळे यांचे कोर्टांत.

अर्जदार— पारी बापाचें नांव नरसिंगदास तर्फे इस्टमित्र चुलता कृपाराम हिरालाल मारवाडी वस्ती तळगी तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें यास.

सर्वांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें मयत जमनाबाई जवजे नरसिंगदास इचे लोकाकडेस येणें असलेले कर्ज रक्कम रुपये १९९८८ वसूल करण्याकारितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख २४ माहे सप्टेंबर सन १९०३ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जांचे चौकशीची तारीख १७ माहे आक्टोबर सन १९०३ इसवी रोजीं मुकरर केली आहे तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरेसुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्याकरितां हजर व्हावें. माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २६ माहे ९ सन १९०३ इसवी.

G. W. Bapat.
सिव्हील ज्यडज्य.

---

## वर्तमानसार

चंद्रभागेचा पूल— पंढरपूर म्युनिसिपालटीनें तेथील चंद्रभागेच्या पुलाकरितां दोन लाख रुपये देण्याविषयीं ठराव केल्याचें समजतें. सुद०

त्रावणकोर सरकारानें नुकतेंच एका विद्यार्थ्यास इंग्लंडमध्यें शेतकी संबंधी रसायनशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां पाठविलें आहे.

मुंबईस कांहीं दिवसांपूर्वीं क्राफर्ड मार्केट जवळील सिताराम बिल्डिंगचा कांहीं भाग पडून जो मोठा अपघात होऊन माणसें दगावलीं, या बाबतींत घराचें बांध काम करणारा मेस्त्री जुडा शालोम आणि घराचे मालक मि० सीताराम लक्ष्मण यांजवर खटले करण्यांत आले होते परंतु पहिला निर्दोषी ठरला, व दुसऱ्या वरील खटला काढून टाकण्यांत आला.

कोलंबिया युनिव्हर्सिटीचे विद्यमानें एका जर्नालिस्टिक कॉलेजची स्थापना करण्यास एम. पिटझर नामक गृहस्थानें ४०७००० पौंडाची रक्कम दिली.

मद्रासच्या अकौंटंट जनरलचे जागीं मॉल लो ऑंग नांवाच्या ब्रह्मी गृहस्थाची नेमणूक सरकारानें केल्याचे मद्रासच्या तारेवरून समजतें. इंग्रजी अंमलांत एवढी मोठी जबाबदारीची जागा ब्रह्मी मनुष्याला दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. शु. सु.

बर्हान येथील एका कोळशाच्या खाणीचे मालक मि. हेनरी मार्टिन यांनीं पिस्तुलानें एका नेटिवाचा प्राण घेतला अशा आरोपाबद्दल पुन्हा चौकशी होऊन मि. मार्टिन दोषी ठरले व त्यांस ३ वर्षें कैदेची शिक्षा झाली. पुरावा बेकायदेशीर घेतला व ज्युरीचा गैरसमज केला अशा प्रकारच्या कांहीं तक्रारी करून माझी आणली चौकशी व्हावी असें त्यानें हायकोर्टांत अपील केलें हे मुद्दे कोर्टास पसंत पडले नाहींतच, पण शिक्षेच्या कडकपणा संबंधाचा विचार करण्याकरतां मात्र त्याचें अपील दाखल करण्यांत आलें आहे !

मागच्या शनवारीं प्रार्थना समाजांत माजी हायकोर्ट जज्ज के. मि. तेलंग याच्या श्राद्ध तिथीचा दिवस साजरा करण्यांत आला. कांहीं दिवसापूर्वीं त्याच मंदिरांत के. मि. रानडे यांची श्राद्धतिथी साजरी करण्यांत आली होती. शिवाजी उत्सवास नांवें ठेवितात त्यांपैकींच कित्येकांनीं हे उत्सव केले असें समजतें. या त्यांच्या कृतींतील विसंगतपणाचें सखेदाश्चर्य वाटतें. मेसर्स. रानडे व तेलंग हे जसें आलीकडच्या काळांतील मोठे पुरुष होऊन गेले त्याचप्रमाणें श्री शिवाजी महाराजही एक मोठे पुरुष होऊन गेले; इतकेंच नव्हे तर त्या महात्म्याची योग्यता वरील जोडी पेक्षांही अधिक आहे. असें असतां त्या उत्सवास हे लोक नांवें ठेवतात आणि त्यावरील सर्वां पेक्षां श्रेष्ठ जे गजानन महाराज त्यांच्या उत्सवास खूळ ह्मणतात आणि मेसर्स. तेलंग व रानडे यांचे उत्सव करण्यांत धन्यता मानतात. याला काय ह्मणावें ?

दापोळच्या हेडमास्तराकडे चोरी करणाऱ्या असिस्टंट मास्तरास १६ महिन्यांची शिक्षा झाली ! मुलांस नीती शिकविणाऱ्या या असि. मास्तरास चोरीच्या मालासह मचव्यांत पोलिसानें पकडलें व फराळाच्या डब्यांतून चोरीचे दागिने काढले !! शिक्षकांनो विचार करा !

म्हैसूरचे महाराजांचे धाकटे बंधु येता दसरा झाल्यानंतर अजमीर येथील राजकुमार कालेजांत शिकण्यास जाणार असें समजतें.

कालिकत येथील झामोरिन कालेजांत मागच्या शनवारीं कांहीं जलसा चालला असतां तेथें नवीन बांधलेला कांहीं भाग एकाएकीं कोसळला व सुमारें २९ विद्यार्थ्यांस इजा झाली. सुदैवानें त्यांस फारशी इजा झाली नाहीं. निष्काळजीपणाबद्दल मेस्त्रीवर फिर्याद होते कीं काय पहावें !

निळगिरी प्रांतामध्यें सोनें सांपडत असून कुनूरच्या शेजारीं बेनहोप येथें तें काढण्याचे प्रयत्न फार जारीनें चालले आहेत. या प्रांतांतून सोनें काढण्याचे कारखाने पूर्वीं होते अशा संबंधानें तेथें पुरावा आहे.

सिमला कालका रेल्वेवरील मुख्य बोगद्यांतून मागच्या आठवड्यांत गाड्या येऊं जाऊं लागल्या. सिमल्यापासून १० मैलपर्यंत एक आठवडाभर त्या चालणार आहेत.

'धी एको' नांवाच्या पत्राची टीका थोडक्यांत आणि मासलेदार असल्यामुळें ती याखालीं दिली आहेः—पार्लमेंटच्या सेशना पैकीं ज्या रात्रीं हिंदुस्थानी बजेटाचा प्रश्न सभेपुढें येतो त्या (किंवा तीन) रात्रीं सर्वांस कंटाळवाण्या होत. या दिवशीं शांत व काळ्या रंगाच्या लाखो लोकांच्या सुखदुःखाचा निवाडा व्हावयाचा असतो आणि या शेवटच्या दिवशीं त्या कामाकरतां अगदीं थोडे गोरे लोक त्या ठिकाणीं जमतात. व: ?

अयोध्या—रोहिलखंड रेल्वेवर एका मेलगाडीस अपघात झाल्यामुळें कांहीं लोकांस दुखापत झाली तो अपघात बाबू यू. एन. बानर्जी नांवाच्या एका स्टेशन मास्तराच्या निष्काळजीपणामुळें झाला असें ठरवून त्यास ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली आहे !

सेंट जेम्स ग्याझीट नांवाच्या पत्रानें प्रसिद्ध केलें आहे कीं, मि. आस्टेन चेंबरलेन यांस चान्सलर आफ धी एक्सचेकर नेमलें असून ती नेमणूक राजेसाहेबांनीं मंजूर केली आहे. त्याचप्रमाणें लार्ड सेलबोर्न यांची वसाहतीच्या सेक्रेटरीच्या जागीं, मि. आरनोल्ड फारेस्टर यांस लढाईखात्याचे सेक्रेटरी, मि. ब्राडरिक यांस हिंदुस्थानचे सेक्रेटरी, आणि लार्ड स्टानले यांस पोस्टमास्तर जनरल अशा नेमणुकाही मंजुर करण्यांत आल्या आहेत असें समजतें.

सर्व्हियामध्यें मासेडोनियांतील बंडाकरतां कांहीं टोळ्या तयार होत आहेत असें कळल्यावरून पेटे सरकारानें सर्व्हियाचें तिकडे सैन्य मागितलें आहे. यास सर्व्हियानें उत्तर दिलें कीं, त्याचा बंदोबस्त करण्याची मी आपली शिकस्त केली, परंतु ख्रिश्चनांची होत असलेली एकसहा कत्तल आणि तुर्क लोकांची दांडगाई ही बंद होऊन चांगली सुधारणा होईपर्यंत सर्व्हियांतील लोकांचा राग मला शांत करतां येणार नाहीं. ठा. अ.

सुधारकांस समाज पुढें ढकलण्याची हांव जितकी मारी तितकेंच उद्धारकांस मागें ओढून धरण्याची मारी. एका पक्षास विसाव्याही शतकाच्या पुढें मरारी मारावी वाटते तर दुसऱ्यास इसवी सनास आरंभ झाला नसल्या सारखेंच वाटतें. पण या उभयतांच्या वाटण्यानें समाज थोडाच अडून बसला आहे व बसतो आहे ? सुधारकांच्या बडबडीस किंवा उद्धारकांच्या मुरकट दाबीस समाज भीक न घालतां आपल्या अनुकूल परिस्थिती प्रमाणें तो आपले पाऊल पुढें पुढें टाकीत आहेच. इंग्रजी शिकण्याच्या अगत्यानें परदेशीं गमन, आगगाडींतील विटाळ, चहा सोडावाटर इत्यादि नवीन पेयें, डोक्यावरील कॅाप किंवा इंग्रजी तऱ्हेचे कपडे या भागांत समाजाचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे. यांतील एक दोन गोष्टी वजा करून बाकीच्या बद्दल कोणचाही मतभेद असू शकणार नाहीं. परंतु अपेयें अभक्ष्य, आपलेपणा विसरून जाणाऱ्या सवयी, व सबगोलांकारानें उत्पन्न होणारी रामभट वल्लद हुसेनजी खिची अशा प्रकारची प्रजा, ही जर सुधारकांच्या सुधारणेचीं रूपांगें असतील तर ईश्वर करो व अशा सुधारणेपासून समाज दूर सरो.

स्त्रियांचे व्रतबंध लाऊं इच्छिणारे, अतिशूद्रांच्या ताटांत बसून प्रागेज पक्वान्नावर झोड देणारे, काम शांती करितां पाहिजे त्या स्त्रीसी मनसोक्त विवाह लावणारे व साहेब बहादुराकडून रावसाहेबी किंवा दुसरें एखादें शेंपूट जोडून घेण्याकरितां किंवा साहेबी थाटानें जठरानल शांती करितां धर्मद्रोही व बांधवद्रोही अधमाधम पाजी व्यतिरिक्त सुधारक आणि उद्धारक यांच्या मतांत थोडा सुद्धां भेद नाहीं. पण सुधारकी टोपण नांवाखालीं लपून हिंन्याच्या संगतीनें आपणही कोंदणांत शोभावें ह्मणून कांहीं दुर्धीरक कंकरांनीं नाहीं नाहीं त्या कुविचारानें आपसांतील मतभेद वाढवून कच्या आर्य पुत्रांत यादवी माजविली; आणि या यादवी पायांत चिपळूणकर टिळकांचा देशाभिमान; आगरकर, जिन्सीवाल्यांचा कष्टसाध्य करारीपणा, तेलंग, रानड्याची विद्वत्ता, भांडारकर जोशी यांचा बहुश्रुतपणा व पटवर्धन पंडित यांची बुद्धीमत्ताही मातीमोल होऊन गेली. हाय हाय !!!

बार्शीरोडपासून पंढरपूरपर्यंत व बार्शीटौन पासून तडवळपर्यंत रेल्वेचा आरंभ करण्यास मंजुरी मिळाली आहे. क.

महाराष्ट्रांतील नव्हे तर सर्व हिंदुस्थानांतील वजनदार पुढाऱ्यापैकीं एक पुढारी प्रोफेसर व नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे येत्या इलेक्शनांत विलायतेंतील पार्लमेंटाचे मेंबर होण्यास जाणार आहेत. व त्याकरितां ते लवकरच विलायतेस जाणार आहेत. शाबास !

शेट दादाभाई नौरोजी यांचा ७९ वा वाढदिवस मुंबईच्या लोकांनीं साजरा केला.

बेळगांवास महालक्ष्मीच्या उत्सवा प्रीत्यर्थ १२ रेडे आणि ४००० बकरी बळी पडली देवी प्रीत्यर्थ अशा हत्या करण्यांत समंजसपणाचा मार्ग काय असेल तो असो.

गंडकी, रोहणी, राप्ती, गोग्रा वगैरे नद्यांस महापूर येऊन त्यांचें पाणी, गंगा सांचून भरलेली असल्यामुळें त्यांत शिरलें नाहीं व त्यामुळें गोरखपूर प्रांतांत तें सर्व पसरलें त्यामुळें शेतकऱ्यांची घरें व जनावरें वाहून गेलीं. जंगलांतील वाघ, चित्ते, हत्ती, वगैरेनाही जलसमाध मिळाली ! शेतकऱ्यांचे झोपड्यांतील व बाजार पेठेंतील धान्य सुमारें पाऊण लक्ष रुपयांचें वाहून गेलें असें ह्मणतात. रा. भू.

कापसाचा दुष्काळ पडल्यामुळें लांकाशायरच्या लोकांची विपत्ती फार वाढली असून हजारों लोक उपाशी मरत आहेत असें प्रसिद्ध झालें आहे.

लवकरच रोम येथें रशियाचे झार साहेब जावयाचे आहेत. तेव्हां आपण त्यांच्या विरुद्ध चळवळ करूं. अशी रोमच्या सोशिआलिस्ट लोकांनीं आपल्या सरकाराला धमकी दिली आहे.

बलुचिस्थानमध्यें पुष्कळ सर्वेअर्स पाठवून हिंदुस्थान सरकारानें सिस्टन नुष्की रेल्वे नेऊन जावयाची असें ठरविलें आहे अशा बलुचिस्थानाचे भागांचा बरोबर नकाशा काढून घेण्याचें काम झपाट्यानें चालविलें आहे.

कानपूरच्या म्युनिसिपल टिटीवर तिचा कर भरला नाहीं ह्मणून तिनें आपणास कैद केल्यावरून मि. हारिसन नावाच्या कानपुरच्या एका युरोपियन ब्यारिस्टरानें पन्नास हजार रुपयांच्या नुकसानीची फिर्याद केली आहे.

मेक्सिको येथें एका तरुण मनुष्यानें पैज मारून केवळ दहा दिवसांच्या आंत तीन तरुण पोरींना पळवून नेल्यामुळें त्यास मोठें इनाम मिळालें. पण लगेच तेथील पोलिसानें त्याला त्याजबरोबर असली गैरशिस्त पैज मारणारासह कैद करून त्याजवर खटला चालविला आहे.

मि० सुरेंद्रनाथ बानर्जी हे बंगाली गृहस्थ कांग्रेसच्या कारणानें तरी इकडच्या सगळ्या लोकांस माहीत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हे बंगाली ब्राह्मण असून ख्रिस्ती झालेले होतें. पण आतां पुनः हिंदु होऊन त्याच्या जातीच्या लोकांनीं त्यांस जातींत घेतलें आणि हिंदुधर्माप्रमाणें त्यांनीं आपल्या आईचें नुकतेंच श्राद्धही केलें, हे पाहून ख्रिस्ती लोक चडफडू लागले आहेत. त्यास प्रायश्चित्तावांचून जातीनें जातींत घेतलें व त्यांनीं श्राद्ध केलें पण त्या विधीवर यांचा विश्वास असल्याचा संभव आहे काय ? असल्या ते ख्रिस्ती लोक, कोल्हा करीत आहेत असें प्रबोद ह्मणतो. जग०

दुर्दैवी राजा— काठेवाडांतील बिळखा संस्थानचे राजे, राज्यकारभार चालविण्यास नालायक ठरून सरकारच्या ठराव प्रमाणें त्यास गेल्या आठवड्यांत अहमदनगरास आणून ठेवण्यांत आलें.

चीनकडे रशियाची फौज आली—वीस हजार नवीन रशियन सैन्य, मॉस्को येथून सैबेरियन रेल्वेवरून मान्चुरियाकडून पोर्ट ऑथर येथें जाण्यासाठीं निघालें आहे.

राजीनामा दिला—लॉर्ड जार्ज मि. चेंबरलेन वगैरे प्रधानांनीं राजिनामा दिला.

दंगा—नरूर येथें मुसलमान व ख्रिस्ती यांच्यामध्यें मोठा दंगा झाला. दोन्ही पक्षाचे पुष्कळ लोक मेले.

REGISTERED No. N 4

बाहेरगांवी टपालहाशिलांसह ........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ०६
दुसरे खेपेस ...... .......८१

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptionsto be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 12 OCTOBER 1903 NO 40

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १२ माहे आक्टोबर सन १९०३ इ० अंक ४०

### नोटीस

रा. गणेशदास गुलाबचंद मारवाडी दुकान खामगांव यांस व रा. त्रिलोकचंद व रा. सेवाराम व रा. नारायणदास वल्लद मुळचंद मारवाडी दुकान नागझरी तलुके खामगाव यांसः—

नोटीस देणार उमीचंद वल्लद सादलसी मारवाडी दुकान खामगांव. याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी सर्व आणि मी असे आज पावेतो एकत्र कुटुंबांत राहत आलों आहोत. आजपावेतों कोणतेच प्रकारची विभक्तता झाली नाहीं. तथापि यापुढें माझी इच्छा आहे कीं. तुह्मी सर्व व मी मिळून आपसांत, आपली जी काहीं स्थावर जंगम मिळकत असेल तिचे हिस्से वाटे करून घ्यावे. व ज्यानें त्यानें आप आपले वेगळेपणानें राहून पुढें ज्याची त्यानें व्यवस्था पहात जावी.

आपली जी एकंदर इस्टेट असेल त्यांत माझा तिसरा हिस्सा आहे. व बाकी दोन हिस्स्यांत तुह्मी सर्व आहात. याप्रमाणें तुह्मी वागांव व मीही वागण्यास तयार आहे. आपली भी एकंदर इस्टेट आहे ती फार जरी मोठी नाहीं तरी ठिकठिकाणीं वेगवेगळी आहे. यास्तव तुह्मास अगाऊ कळविले जात आहे कीं, नोटीस पावले दिवसा पासून एक महिन्याचे आंत, खामगाव; अडसूळ, नागझरी व निराट येथील सर्व दुकानचे घेण्यादेण्याचे हिशेब बरोबर रीतीनें तयार करावेत. आणि एकंदर स्थावर जंगम मिळकत किती, कोठें, कोणाचे ताब्यांत आहे अशाबद्दल खुलासेवार अडतट्टा तयार करावा. नंतर हिस्सेरसी करावी तुमचे कडून आपसांत बरोबर हिस्सेरसी होणार नाहीं असे दिसल्यास पंच नेमून व्यवस्था लावावी. कसें ही करून आता विभक्तता होणें जरूर आहे. नोटीस पावले दिवसा पासून पुढें वाटे होई पर्यंत तुह्मी समाईक इस्टेटीवर जर कांहीं देणें करून ठेवाल किंवा कांहीं विक्री वगैरे कराल ती मला कबूल नाहीं. तरी तसें करूं नये.

ही जाहीर नोटीस दिली आहे व विचार पूर्वक मुदत ही पुष्कळ दिली आहे. तरी त्यांत निकाल होईलच असें करावें. आपण मुदतींत असें न केलें तर मात्र मला विनाकारण खराब व्हावें लागेल. त्यांत तुमचें नुकसान होईल. मी स्वतः लिहिणार नसल्यामुळें. कागद पत्रासंबंधीं तयार करण्याचें काम तुमचेकडे आहे. मजला कांहीं दुसरें काम करण्यास सांगाल तर मी करण्यास तयार आहे. ही नोटीस तुह्मा सर्वांस लागू आहे. तरी या प्रमाणें लौकर व्यवस्था करावी. कळावें. खामगांव ता. ६ माहे अक्टोबर सन १९०३ इ.

उमीचंद सादलसी राहणार खामगांव
दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा. रा. आत्माजी राघव वकील राहणार तालुके जळगांव मेक जिल्हा खानदेश यांस.—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी दिवाणी मोकदमा नंबर २७४४ कोर्ट जळगांव यांत मजवर मनाईची
१९०२
जप्ती दिली आहे ती कोणते कारणावरून हें कळलें नाहीं व मजकडेस रा० रा० विनायक बाळशेट याचें कर्ज आहे हें कशावरून याजबद्दल ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आत जबाब द्यावा नाहीं पेक्षां तुमचे वर विरुद्ध अर्ज देऊन इजतीबद्दल दावा केला जाईल. मजला वरील इसमाचें मुळींच कर्ज नसून माझा कोणतेही प्रकारें गहाण वगैरेचा कांहीं संबंध नाहीं करितां वरील नोटीस पावतांच आपण कोणते आधारावरून मनाईची जप्ती बजावली ह्याचें कारण कळवावें ता० ९।१०।०३ इसवी.

सही.

माधव मुकुंद भंगी जात ब्राह्मण
राहणार पिंपळगांवकाळे ता.
जळगांव जिल्हा आकोला.

## कर्मयोग

( रा. रा. व्यंकटराव कृष्ण देसाई यांचा निबंध ) नंबर ३

आपल्या सुखाकरितां जितक्या जास्त वस्तु उत्पन्न केल्या जातील, आणि जितक्या जास्त सोई होतील तितक्या करणाकडे ते अव्याहत परिश्रम करीत आहेत. या जगांत कांहीं नवीन शोध करण्याकडे जो यत्न करीत नाहीं त्यास ते केवळ रिकामटेकडाच समजतात. या जगांत ज्या कर्माचें फळ मिळूं शकतें, तेंच काय तें योग्य कर्म होय, असें ते समजतात. कांहीं लोक शास्त्रांचें परिशीलन करितांना आपणास आढळतील. केवळ ज्ञानप्राप्तीकरितां शास्त्रीय शोध लावण्याचा त्या सद्गृहस्थांचा हेतु असतो. या त्यांच्या उद्योगानें कोणती फलप्राप्ति होते हें पाहण्याकडे त्या शास्त्रज्ञा इतकीच समाजाची ही उत्सुकता असते, किंबहुना जास्त असते असें ह्मटलें तरी चालेल. परंतु समाजाचा हेतु काय असतो बरें? शास्त्रज्ञांसारखाच असतो काय? नाहीं, त्यांच्या अनुभवानें त्यास जें ज्ञान प्राप्त होत आहे त्याचे योगानें आपली ऐहिक संपत्ति वाढण्याचा संभव आहे. अशा आशेनें त्या शास्त्रज्ञाच्या परिश्रमाचा काय परिणाम होतो याकडे त्यानें लक्ष वेधलें असतें. या प्रमाणें नेहमीं विषयवृद्धीची खटपट चालूं आहे व तशी वृद्धिही होत आहे. वासना तृप्ती करितां लागणाऱ्या पदार्थांची व नवीन वासनांची सारखी शर्यत लागल्यासारखी दिसते. एकच प्रकारचा उपभोग कांहीं काल पर्यंत मिळाल्यामुळें चैनी श्रीमान् लोक कंटाळतात व नवीन तऱ्हेचें ऐहिक सुख देणारे विषय आणखी पाहिजेत असें त्यास वाटत असतें. हा एक पक्ष झाला. आतां अशा श्रीमंत लोकांच्या वासना तृप्त करण्याकरितां लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणारे कारागीर लोक आपली चांगली रोजी चालावी व पुष्कळ फायदा व्हावा या हेतूनें सुखोपभोगाचे निरनिराळे नवीन प्रकार व त्याकरितां लागणारी सामुग्री शोधून काढण्यांत चूर झालेले दिसतात. हा दुसरा पक्ष. ह्या दोहोंत एक सारखी चढ वढ चाललेली दृष्टोत्पत्तीस येते. एक पक्ष विषय वृद्धीची अपेक्षा करितो व दुसरा पक्ष पहिल्या पक्षाच्या वासना वाढविण्याच्या खटपटींत असतो. जलदीनें प्रवास व्हावा याकरितां किती तरी शोध व सोयी झाल्या आहेत पहा. पूर्वी जो प्रवास करण्यास एक महिना लागत असे तोच हल्लीं एक दिवसांत करितां येतो. पण त्यामुळें ते लोक पूर्वी पेक्षां जास्त सुखी झाले काय? किंवा जलदीनें प्रवास करण्याची त्याची इच्छा तृप्त झाली काय? नाहीं. उलट शास्त्रज्ञ लोकांच्या कानीं कपाळीं त्याची नेहमी सारखी ओरड चालूं आहे कीं "अहो, वाफेपेक्षां जास्त जोरदार दुसरी एखादी शक्ति शोधून काढा. विद्युच्छक्तीच्या उपयोग या कामाकडे होईल तर फार बरें होईल, तारायंत्राचे बातमी इतके जलद आपण प्रवास करूं. इतके जरी तूर्त घडूं शकत नसेल तरी या वाफेच्या सामर्थ्यानें जो प्रवास होतो त्याहून ज्यास्त जलदीनें प्रवास होईल अशी कांहीं तरी दुसरी युक्ति शोधुन काढा बुवा. आह्मी या वाफेला कंटाळलों."

पुढें चालू

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ६ शके १८२५

## चंद्रग्रहण

गेल्या मंगळवारीं हा चंद्रग्रहणाचा योग होता. पूर्वरात्रींच ग्रहण लागणार होतें आणि आकाश पुष्कळसें निरभ्र होतें ह्मणून ग्रहण पाहण्याची सर्वांस मोठी मौज वाटली, पंचांगांतील स्पर्शकाल पुष्कळच चुकला आणि पाऊण तासाच्या उशिरानें ह्मणजे सात वाजतां प्रथम उत्तरेच्या बाजूनें पृथ्वीची छाया चंद्रबिम्बावर पडूं लागली. त्या सुमारास चंद्र क्षितीजावर २९।३० अंशावर आला होता आणि ह्मणूनच त्याच बिम्बाचा उदयकालच्या विस्तृत वर्तुळा सारखा नसून चांगला संकुचित झालेला होता. या बिंबाच्या संभोंवार एक चंद्र किरणाच्या प्रतिमेचें औरें एक वर्तुळ दिसे व त्यानें मूळच्या चन्द्रबिम्बाला मोठी शोभा आली होती. स्वस्तिकाच्या दिशेकडील चंद्राचा उत्तरेकडील भाग प्रथम पृथ्वीच्या पडछायेनें स्पर्श झाला आणि नकाशावर जशीं अक्षांश असतात तशीं वर्तें चंद्रबिम्बाच्या पातळीवर पडलींची छाया रेखाटीत आहे असा भास झाला. ही छाया जसजशी वाढत चालली तसतसा चंद्राचा प्रकाशित भाग शुद्धपक्षातील चतुर्दशी, त्रयोदशी, द्वादशी, इत्यादि तिथींच्या व्युत्क्रमानें कमी कमी होत चालला. फक्त भेद इतकाच कीं चंद्रबिम्बाच्या अर्धवर्तुळाचीं दोन्हीं शृंगाग्रें उत्तरेकडे वळलेलीं होतीं आणि शुद्धपक्षांतील चंद्रबिम्बाचा भाग पश्चिम आकाशाकडे वळलेला असतो. चंद्राचा भाग क्रमेनें अवृत्त होत होत अखेरीला प्रतिपदेच्या किंबहुना द्वितीयेच्या चंद्रा सारखी कोर छायेनें ग्रासल्या शिवाय राहिली. ग्रहणाची वृद्धि होत जाते तस तसें हवेमध्यें अधीक थंडी पडल्यासारखें भासूं लागलें. पौर्णिमेचा चंद्र जसजसा स्वस्तिकीं येऊं लागतो तसतसा आल्हाद व उत्साह वाढत जातो. पण ग्रहणाच्या दिवशीं डोळ्यांत आळस अधीक भरला, निद्रा ग्रासूं लागली व निरुत्साह वाटूं लागला. हा चमत्कार ध्यानांत ठेवण्यांसारखा आहे. वातावरणांत कोणता विलक्षण फरक पडतो तें कांहीं उमगत नाहीं पण वस्तुस्थिती ही अशी होते हें निर्विवाद आहे. हा ग्रहणाचा काल एका प्रहरभराचा होता. चंद्रावर मोठा ढग येऊन अंधार पडतो तो निराळा आणि हा पृथ्वीच्या गोल छायेचा कृष्णवर्ण सर्व सृष्टीलाच कृष्णवर्ण आणितो. सर्वत्र अंधःकार अधिकाधीक निबीड होत गेला आणि ग्रहणाचा मध्यम काल उलटला तसतसा तोच अंधःकार अंशाअंशानें कमी होऊं लागला. पुनः चंद्र पूर्ववार प्रकाशूं लागला आणि तो औषधीचा पती पृथ्वीवरील वृक्षवेलींवर आपला अमृतरस पुनः सिंचूं लागला.

## हिंदुस्थानाचा व्यापार

हिंदुस्थानच्या आयात व निर्यात मालाचा व्यापार कोणत्या स्थितींत आहे, ह्या संबंधाची माहिती सालोसाल प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी आंकड्या वरून कळून येणार आहे. त्या आंकड्या वरून दुसऱ्या एका गोष्टी-बद्दल सरकाराची व त्याच प्रमाणें देश धुरीणांची खात्री सहज होणार आहे; ती गोष्ट हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति ही होय. सन १८९७–९८ साला पासून आज पावेतों हिंदुस्थानच्या आयात व निर्यात मालाच्या आंकड्यांचें निरिक्षण केलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं निर्यात मालाच्या किंमतीचें प्रमाण सालोसाल वाढत चाललें आहे. आयात व निर्यात मालाच्या किंमती मधील फरक सन १८९७–९८ सालीं रु० १४,९२,८९,००० होता तो सन १९०२-०३ सालीं रु. ३३,१८,२७,००० झाला. ह्मणजे गेल्या पांच सहा वर्षांत हिंदुस्थानांतील माल बाहेर देशीं किती जात आहे ह्याची कल्पना सहज होणार आहे. हिंदुस्थानांतील कारखान्यांतून तयार झालेला माल बाहेर देशीं गेला असतां तर दुःख मानण्यास कांहीं कारण नव्हतें, कारण त्या योगानें हिंदुस्थानच्या प्रजेस माल तयार करण्याबद्दलची मजुरी मिळून, त्या वरील नफाहि एतद्देशीय लोकांस मिळाला असतां; परंतु हल्लींच्या स्थितींत बाहेर देशीं जो माल रवाना करण्यांत येतो त्यांत कच्च्या मालाचेंच प्रमाण जास्त असतें. व त्याच प्रमाणें बाहेर देशीं पाठविल्या जाणाऱ्या धान्याचें ही प्रमाण वाढत चाललें आहे. ह्या योगानें गरीब लोकांस पोटा पुरतें धान्य विकत घेण्यास येथें मिळूं शकणार नाहीं; ह्या मुळें धान्याचा भाव अर्थातच् वाढतो; परंतु शेतकी सारख्या धंद्यांतील मजुरदारांची मजुरी मात्र पूर्वीं इतकीच कायम राहिली आहे! ह्मणजे दिवसें दिवस हिंदुस्थानांतील गरीब लोकांस सुखासमाधानें आपला चरितार्थ चालविणें. जास्त कष्टप्रद होत जाणार! ह्या स्थितीचा विचार करणें भयंकर खरें परंतु ती टाळण्या करितां सरकारानें व देशांतील धुरीण पुरुषांनीं नेटाचा प्रयत्न करणें हें उभयतांचें कर्तव्य होय. हिंदुस्थान देशांतील मुख्य उपजीविकेचा धंदा शेतीचा होय; तेव्हां शेतीची सुधारणा करण्या विषयीं सरकारचे हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु दरवर्षीं हिंदुस्थानांतून बाहेर देशीं जाणारीं जवस वगैरे गळितें, हाडें, व कातडीं ह्यांचें वाढतें प्रमाण पाहिलें असतां शेतीची स्थिति दिवसें दिवस वाईट होत जाणार हें माफीत खरें होणार अशी भीति वाटूं लागते. डा. व्हाएलकर ह्यांचें असें मत आहे कीं जवस वगैरे गळित धान्या पासून उत्पन्न होणारें खत हें जमीनीला दिल्यावांचून ती आपणांस पुरेसें उत्पन्न देणार नाहीं परंतु हल्लीं जवस वगैरे गळितापासून तेल, ढेप वगैरे काढण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांत न केल्यामुळें हिंदुस्थानची जमीन त्यापासून उत्पन्न होणाऱ्या खतास मुकणार! त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतून परदेशीं जाणाऱ्या हाडांचा उपयोग खत तयार करण्याचे कामीं होत असल्यामुळें त्या खताचा ही उपयोग आपल्या देशांतील जमीनीस होईनासा झाला आहे. व जनावरांच्या कातड्यांचें प्रमाण अलिकडे वाढत आहे ह्यावरून शेतीचीं जनावरें दिवसेंदिवस कमी होत चाललीं आहेत हें अनुमान खरें मानल्या वांचून चालत नाहीं. ह्याप्रमाणें देशाची खरी संपत्ति कमी होऊं लागली आहे. कापसाच्या व इतर कारखान्याची स्थिति, जकात नांवाचा कायदा व देशी कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालावरील जकात ह्या कायद्याच्या बंधनांनीं असमाधानकारक झालेली दिसून येत आहे. परंतु हिंदुस्थानांत जर्मनी वगैरे देशांतून येणाऱ्या साखरेवर जकात बसविली असल्यामुळें, मॉरिशिअस वगैरे ब्रिटिश कॉलनींतील साखरेच्या व्यापाराची चलती झालेली दिसून येते. अशा वेळीं आपल्या सरकाराकडून ब्रिटिश व्यापारास उत्तेजन मिळण्याकरितां कायद्याची मदत हवी तशी मिळते व हिंदुस्थानच्या व्यापारास मात्र तशी मदत मिळूं नये ह्या गोष्टींचा विचार प्राधान्यें करून आपल्या दृष्टीसमोर आल्यावांचून रहात नाहीं. आणि हें वैषम्य काढून टाकण्याकरितां कायदेशीर चळवळ करणें अगदीं जरूरीचें आहे अशी मनाची खात्री होते.

—:०*०:—

## सुलतानी

अस्मानी कशाला ह्मणतात याचा अनुभव लार्ड नार्थकोट यांस गेल्या दुष्काळांत व प्लेगाच्या प्रसंगीं फार फार आला. आह्मामध्यें प्लेगाची अस्मानी हल्लीं जावल्य आहे आणि तशांत आकोलेकरांस गेल्या मंगळवारीं सुलतानीचाहि मासला थोडासा मिळाला. ईश्वरक्षोभापुढें जसा इलाज नसतो तसा राजदंडा पुढेंहि कोणाला ब्र काढतां येत नाहीं. या सुलतानीचा वृतान्त अगदीं ताजा आहे.

सुमारें पंधरा दिवसापूर्वीं येथें एक उमरावतीचा बोहरी प्लेगानें आजारी होऊन आला. तो आपल्या भावाच्या घरीं राहण्यास गेला. ही जागा ताजना पेठेंतील पोलिस स्टेशना जवळ आहे. या घरांत आणखी एक चाकर माणूसही प्लेगग्रस्त झाला. बोहरी कांहीं घरा बाहेर सरकारी दवाखान्यांत जाईना. त्या चाकराला कसा तरी बाहेर काढला. उपदेशाची बाजू थकली तेव्हां त्या बोहऱ्याला तसाच त्या घरांत मरूं देणें सरकारी अंमलदारास उचित वाटलें आणि पुढें कांहीं दिवसांनीं तो दवाखान्यांतला माणूसही मृत्यु पावला.

पण येथेंच हा कथाभाग संपला नाहीं. त्या महल्ल्यांत हा प्लेगाचा मृत्यु यंदा पहिलाच झाला. तेथून प्लेगाची वाढ होऊं नये ह्मणून आजू बाजूंनीं दहा बारा घरें खालीं करण्याचा हुकूम मि० डिपुटी कमिशनरांनीं दिला. त्या घरवाल्या लोकांस पुष्कळ उपदेश करण्यांत आला परंतु त्यांनीं तो हुकूम पाळला नाहीं आणि सर्वजण घरोबर गपचीप स्वस्थ बसले. घरें खालीं करण्याचा हुकूम तोडला ही हुकुमाची उदूली असह्य वाटली आणि ह्मणून डिपुटी कमिशनरांनीं त्यांच्यावर फौजदारी खटले करण्या विषयीं मंजुरी दिली कांहीं बोहरी, कच्छी, व इतर कांहीं लोक मिळून सातजणांवर खटले करण्यांत आले आणि वर्ग १ चे माजिस्ट्रेट मे. के साहेब बहादूर यांनीं प्रत्येकाला पंधरा पंधरा दिवसांची साधी कैद गेल्या मंगळवारीं सांगितली. यापुढें रिव्हीजन अर्ज वगैरे होणार आहे असें कळतें पण ही कैदेची शिक्षा ऐकून सर्व गांवभर मोठी चळवळ उडाली आहे.

### सरकारी बाजू

सरकारी बाजूनें ह्मणणें असें पडतें कीं प्लेगानें प्लेग वाढतो, आणि पहिलाच प्लेगाचा मृत्यु ताजनापेठेंतील त्या महल्ल्यांत झाला तेव्हां सार्वजनिक संरक्षणाला मोठा धोका बसण्याचा संभव दिसला. मरणाऱ्या रोग्याला स्थलान्तर करावयाला लावूनही ही संसर्गाची बाधा टळण्यासारखी नव्हती. ह्मणून लोकांच्या कल्याणासाठींच आसपासचीं घरें खालीं करणें भाग वाटलें. लोकांस त्यांचा जीव कसा वांचेल हें समजत नसलें तरी सरकाराला तो वाचविण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. रुग्णाला अमृत विषवत् वाटलें तरी तें त्याला जबरीनें पाजतात आणि मृत्यूला बोलावणारा प्रजासमूह उपदेश ऐकत नाहीं तर त्याला कांबवर सुरक्षित स्थळीं नेणें सरकारचें पहिलें कर्तव्य होय. आणि तशांत कांहीं आसपासच्या लोकांनीं घरें खालीं केलीं तर बाकीच्या थोड्या जनसमूहावरील प्लेगाचें विघ्न टळतें असा सरकारचा पक्का ग्रह आहे आणि ह्मणूनच त्या प्लेग झालेल्या बोहऱ्यांच्या आसपासच्या घरवाल्यांस घरें खालीं करण्याचा हुकूम देण्याची अत्यंत जरुरी वाटली. हा हुकूम त्या लोकांस अयोग्य व अन्यायाचा वाटला होता तर त्यांनीं त्याच्यावर अपिल करावयाचें होतें. तशीं कांहींच हालचाल न करितां ते स्वस्थ बसले. ही हुकुमाची अमान्यता अधिकाऱ्यांस कष्टप्रद वाटली आणि त्यांस त्यांचा अंमल चालविण्याचें संकट वाटलें. हाच विचार माजिस्ट्रेट साहेबांनीं घेतला असावा आणि ह्मणूनच त्यांनीं राजदंडानें त्या अपराधी लोकांस ताळ्यावर आणण्याचा हुकूम फर्मावला. सरकारी अंमल विजयी झाला. हुकूम तोडणारे लोक कैद भोगण्यास तुरुंगांत गेले आणि त्यांच्या या शिक्षेनें इतरत्र सरकारी हुकूमांची मानमान्यता व दहशत सर्व लोकांवर बसली. हा सरकारी पक्षाचा धन्यवाद होय!

### लोकमत

आतां लोकांची बाजू कशी काय आहे ती पाहूं. प्लेगाचा अनुभव श्रेष्ठ इंडिया सरकारास येऊन चुकला आहे. त्यांनीं मुंबई इलाख्यांत नानाविध उपाय केले; आणि प्लेगापुढें हात टेंकले आहेत. प्लेग संसर्गानें वाढो, किंवा क्रमशः एका स्थळावरून दुसऱ्या स्थळाला जावो, इंडिया सरकारच्या बंदोबस्ताचें धोरण फार ढिलें व सैल दिसतें, कोणास कोठेंहि जाण्याची मनाई नाहीं. रेल्वेचा प्रवास धडाक्यानें चालू आहे. यात्रा, जत्रा वगैरे मात्र होतां होईपर्यंत भरूं देत नाहींत कोणाला घर खालीं करण्यास लावूं नये किंवा प्लेगाचा रोगी जबरीनें कोठें ही ...

नियम आहे अशी लोकांची समजूत आहे. लोकांस उपदेशाच्या बाजूनें प्लेगाचे प्रतिबंधक उपाय सांगावे इतकाच कारभार सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं आहे असा लोकांचा ग्रह अधिकाधीक दृढ होत चालला आहे. दुसरा विचार असा कीं ज्याला त्याला आपला जीव प्यारा आहे. जो तो आपल्या प्राणासाठीं वाटेल तो उपाय करील. आणि पुष्कळसा सुखवस्तु लोकसमूह आपला जीव घेऊन रानांत वनांत जाऊन राहिला आहे परंतु प्रत्येकाला आपल्या प्राणाची किंमत कांहीं मर्यादेपुढें अगदीं नाहींशी होते. या रोगापुढें मनुष्य किती तरी हताश होतो. त्याला त्याचे प्रयत्न निष्फळ वाटतात. चांगलीशीं द्रव्याची अनुकूलता नसली ह्मणजे विद्यमान स्थितींतच प्राण वांचेल तर वांचो, आणि जाईल तर देवाची मर्जी असेंही ह्मणणारे लोक पुष्कळ आढळतील. त्यांच्यापुढें सरकारी उपदेश अगदीं व्यर्थ असतात. सरकारी उपदेशकांची देखील पुष्कळदां मोठी चूक होते. लोकांची गैरसोय मोठीच असते. सरकारी झोंपडीं फुकट मिळालीं तरी तेथें जाऊन त्यांना निभाव लागण्यासारखा नसतो. पुष्कळजण पोटाचे चाकर असतात. दिवसभर मोलमजुरी विवक्षित रितीनें करावी तेव्हां कोठें जाडेंभरडें अन्न खाण्यास मिळतें. अशा लोकांस शहराची वस्ती सोडून लांबवर राहण्यास जातांही येत नाहीं. अशांस घरें सोडण्यास लावण्यापेक्षां त्यांचीं घरें शुद्ध स्वच्छ, व पवित्र, करून देणें फार बरें असें आह्मास वाटतें. या प्लेगाच्या दिवसांत ज्याला दूरवर जाण्याची शक्ति आहे तो कधींही गांवांत सुखानें राहत नाहीं. कांहीं हरीचे लाल तसे हटवादी भेटतील पण त्यांच्यावर फार कडक नजर ठेवण्यांतही फारसा फायदा नसतो.

---

## कडक शिक्षा

गेल्या मंगळवारीं सात इसमांस १५ दिवसांची कैद सांगण्यांत आली. ही शिक्षा फार कडक होय. घरें खालीं न केल्याबद्दल ही शिक्षा फार झाली. शिक्षा देताना ही गोष्ट लक्ष्यांत आणावयाला पाहिजे होती कीं गेल्या सालच्या प्लेगाच्या वेळीं घरें सोडण्या विषयीं सक्ती होत नसे आणि कोणा प्लेगाच्या रोग्यास घरा बाहेर काढण्या विषयीं कडक तजवीजही होत नसे. सरकारी बंदोबस्त असा गुदस्ता होता आणि यंदा त्यांत फरक करण्यांत आला तर तत्संबंधीं हुकूम तोडल्या बद्दल अशी कडक शिक्षा नको होती. प्लेगापुढें अशा बंदोबस्ताची कितपतशी डाळ शिजते याचा अनुभवही येऊन चुकला आहे. या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या ह्मणजे सदहूं १५ दिवसांच्या शिक्षेचा कडकपणा नजरेस येण्या सारखा आहे. ज्या सात लोकांनीं डिपुटी कमिशनरच्या हुकुमाची अमान्यता केली त्यांनीं ती गोष्ट बरी केली नाहीं. राजश्री रुस्तुमजी साहेब यांच्या परिश्रमाची व कळकळीची त्यांस खरी किंमत कळली नाहीं ह्मणून दुःख वाटतें. गोडीनें व सामोपचारानें त्यांनीं आपल्या अडचणी साहेब बहादुरापुढें मांडल्या असत्या तर आह्मास

## जाहिर खबर


### खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अगदीं वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण यांच्या गुणांची प्रतीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं वाच्यांळें आपलीस्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची सर्व जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९लाईन ओपनफेस ........................४०
१९ ,, हंटिंग........................६०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्प्रिंग १८
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें.................२०
१९ ,, हंटिंगचें ......................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपनफेस...........२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच.....................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ...........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ...........३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजनल निनोयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई


---


ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्याबद्दल आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

**धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत**

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील राग, हातवाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची स्वर जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०
२७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी


---

## बक्षीस

हरवलेला किंवा चोरीस गेलेला दागीना

(सांपडून देण्यासाठीं)

आमच्या बंगल्यांतून थोडे दिवसापूर्वी एक दागिना हरपला आहे. तो दागिना म्हणजे सोन्याचा जडावाचा ब्रूच. हा लेडीचा दागिना आहे. यांत फिक्या हिरव्या रंगाचा पारदर्शक निलमणी आठ आणी एवढा पण चौकोनी असा बसविला आहे. हें न विलायती असून दागिन्याची किंमत १०० रुपये अंदाजानें आहे.

दागिन्याची बरोबर माहिती कोणी लावून देईल किंवा कोणी तो आणून देईल तर त्याला चांगलें इनाम आम्ही देऊं आणि हा दागिना कोठून व कसा आणिला या विषयीं कांहींच विचारणा करण्यांत येणार नाहीं असें आम्ही अश्वासन देतों.

आकोला १८।९।०३.

(सही) बी. क्ले.
असिस्टंट कमिशनर.

---


### स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

**धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.**
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P . Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

———

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the etp, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*



*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युनिक्वर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचें अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.



## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार. मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५॥ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई



## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट



अति स्वस्त ! **ज्ञानविलास** अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी थउपक्क माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी. नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर



## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।=।




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम ॥

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दात आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, मेवा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातांनीं फोडतां न येणें, दात मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सर्व उत्कृष्ठ करून दिल्या असत्या, थोडासा यांनीं आडदांडपणाच केला आणि यांचें उदाहरण इतरांस गैर उत्तेजन देण्या सारखें होतें. आह्माला हे माहित आहे कीं एका आरोपीनें रा. रा. क्षसाहेब यांच्या पाशीं घर सोडण्याची कबूली केली तेव्हां त्यांस माफी देऊन तसें करण्या विषयीं योग्य मुदतही देण्यांत आली.

प्रस्तुतचा प्रसंग खरोखरच मोठा नाजूक आहे. अशा वेळीं सरकार व रयत या उभयपक्षामध्यें सामोपचार जितका पाहिजे. अधिकाऱ्यांचे संकल्प फार चांगले असतात पण लोकांचीं प्रापंचिक संकटें देखील मोठीं अवघड असतात. ज्याचें दुःख त्यालाच खरें माहित असतें. अशा स्थितींत नेहमी तडजोडीचा प्रकार स्वीकारला पाहिजे. दोन्ही डोंगराच्या मधून बेताबातानें रस्ता काढण्याचें सरकारी अधिकाऱ्यांनीं शिकावें. केवळ शिक्षेची जरब व अधिकाराचा प्रज्वलितपणा यांनीं लोकांस मदत न मिळतां सरकारी संकल्प सोन्यासारखे असून त्यांचें परिणाम तलवारीच्या धारे प्रमाणें हृदयभेदक होतात. आह्मी उमेद बाळगतों कीं असले कडक शिक्षेचे प्रकार पुनः दृष्टीस पडणार नाहींत.

## राजदर्शन

आपणांचे नवें स्थानिक सरकार ह्मणजे मध्यप्रांताचे नामदार चीफ कमिशनर साहेब होत. हे गेल्या मंगळवारीं मलकापुराकडून उमरावतीला गेले. बुलढाण्याचें डेपुटी कमिशनर कुमार श्री हरमामजी रावजी यांनीं नामदार जे. पी. ह्यूट यांचा चांगला आदरसत्कार केला; आणि साहेब बहादूर ही फार सुप्रसन्न दिसले. आकोल्याच्या भव्य स्टेशनाला निशाणें, पल्लवमाला, चित्रविचित्र रोपांचे कुंडे, सुंदर बिछाईत, इत्यादिकांनीं मोठी रमणीयता आली. मंगळवारीं दिवसा गाडी स्टेशनावर येतांच रा० रा० रुस्तुमजी साहेब, करी साहेब, आण्णा साहेब महाजनी, आप्पा साहेब दामले, मुगुटराव देशमुख, आनंदराव देशमुख इत्यादि प्रमुख गृहस्थ पुढें सरसावले आणि नामदार साहेबांनीं राजश्री रुस्तुमजी साहेब आदिकरून वऱ्या साहेब मंडळीच्या हातांत हात मिळविला आणि कुशल प्रश्न विचारले. नामदारांची मूर्ती उंच व सदृढ असून मुद्रा प्रसन्न विनयशील आणि मितभाषणी दिसली. अधिकारांत रूळलेले असल्यामुळें त्यांस अनुभवही चांगला आहे असें ह्मणतात. सभास्थानीं साहेब बहादूर गेल्यानंतर हार तुरे, अत्तर गुलाब वगैरे देण्यांत आले; आणि लागलींच थोड्या अवधींत गाडीची घंटा झाली आणि पुनः निरोप घेत घेत नामदार ह्यूट साहेब पुढें रवाना झाले.

आकोल्यास प्लेगाचे दोन चार मृत्यु दररोज होतात. प्लेगाचें पाऊल हळूं हळूं पुढेंच आहे. उमरावतीला प्लेगाचा तडाखा चाललाच आहे. प्लेगानें उमरावती उध्वस्त झाली आहे तथापि दररोज ४०.५० मृत्यु होतात आकोटाची २०-२५ मृत्यूंची संख्या कांहीं कमीच होत नाहीं ही गोष्ट मोठी चिंतास्पद होय. बाळापूर तालुक्यांतील पातुराला प्लेगाचा प्रादुर्भाव तुरळकसा झालेला आहे. आतां यापुढें हिवाळा सुरू झाला आहे तेव्हां प्लेगाला जोर येईल असें कांहीं अनुभवी लोक सांगतात. प्लेगानें आमच्या समाजांतील कुटुंबें पुष्कळशीं विस्कळित झालीं, कित्येक तर अगदीं नामशेष झालीं आणि या शिवाय संसारांतलीं दुःखें सहस्रावधि रितींनीं वाढलीं आहेत. ईश्वरावर सर्व हवाला ! आणि त्याच्या मर्जीला जी गोष्ट आली तीच खरी !

# The Berar Samachar

**MONDAY OCTOBER 12 1903**

In reviewing the satisfactory progress of educational affairs in 1902—03, we have thanked Mr. C. H. Candy for his able, efficient and sympathetic administration but we canot help being struck with his inability to meet the growing wants of the province. He deplores very much that the want of proper funds has been a tumbling block in his scheme of making substantial improvements in the department. Money is in fact the real panacea for all defects in our educational machinery; but there seems to be a persistent effort to put off a demand for money. This province records a very slow progres sin the matter of industrial training. Further we shall have to note the first symptoms of decline that forshadows the fate of the Industrial classes that are joined to the primary school at Basim. For want of funds there is no immediate possibility of a separate school of industrial training. Such a school is of course a primary one of the Technical education. We are told that Khan Bahadur Sher Mohammad Khan takes lively interest in the matter but it should be as well remembered that one man's single efforts will make but a small move in the direction of real progress. The history of the Government school of industry at Amraoti is far from satisfactory. The Director writes in a spirit of chagrin when he has to await with patience the sanction of the Government for opening an industrial school on a wider basis. We are sorry that the Victoria Memorial Funds lie unused like an idle capital for years together. The Government donot hope to spare any donation for an industrial school, and it requires a long time before one can realize the consecration of the Victoria Memorial Funds towards the erection of an industrial institution. In fact, there is not one school in the province where a student can acquire the first rudiments of the technical education. This is a deplorable state of affairs.

The learned Editor of the Bengalee has a very suggestive note on the 'conquest by Banks and Railways.' In the midst of his article he proceeds to observe thus:—

"In these days of civilization it is not necessary to make an armed invasion of a country for the purpose of conquering it, The whole thing is managed in a much more refined, in a much more civilized way, Russian traders go to an Asiatic country. Their trade benefits the people. They then establish banks which transact business with the people. They also construct railways which greatly benefit the people. Asiatic people are more or less indigent, the construction and management of these railways are, therefore, financed by these banks. The banks are directed by a mixed agency of Russians and Asiatics. The Russian shares are more numerous than those of the Asiatics in these banks. The real direction of them, therefore, lies in the hands of Russians. But the banks are on the surface of them Russo—Asiatic. The pride of the Asiatic is thus flattered and his suspicions of Russia are lulled to sleep.

"This is the modern process of conquest by Banks and Railways, It was at first practised in India by England in a very rudimentary fashion. It has been elaborated into a grand and infallible system by the genius of Russia. And Germany, which is the youngest of European nations, has learnt these lessons from her elder sisters. And Eastern Asia, on which for a long time she has been casting such a loving eye, will soon have the benefit of these lessons."

We must understand from above that money is the basis of prosperity and of every thing that builds a nation worth the name.

To

The Editor of the Berar Samachar

Sir,

While reading an essay contributed by the Hon. W. P. Reeves, on the "Nation's duties to the Empire," in the "Good citizenship," I found some observations of the writer about our country, which are worth a study by the Government. After noticing that the population like that of India being in a low state of development, will, if kept at peace, multiply rapidly to the level of subsistence, the writer goes on to say that the advent of the British rule in India has secured for her, good laws and all the benefits arising from the observance of the laws of sanitation. But the blessings arising from the British rule, have according to the writer, fallen short, in as much as, (to quote the very words of the honourable gentleman) "we have not attempted to educate our subjects up to any thing like a European level of civilization or to instil into them our ideas of self respect, or our demands for a high standard of comfort. Hence it comes about that in India, despite all that English justice and Western Science can do, vast numbers of the people live within measurable distance of hunger. Our despotism enables them to increase but does not help them to rise, and the population problem in a terrible form is the retribution we meet." These few sentences lay an ideal which both the people and Government should keep before their minds. The above quotation carries some weight in as much as it comes not from one of this country but from one who belongs to the race of the Rulers themselves I thought that the quotation would interest you as well as your readers and it is therefore that I have taken the trouble of sending the same to you. Thanking you in anticipation,

I remain yours truly

R.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— शरदृतूची गुलाबी थंडी मोठी सुखकर वाटते. पावसाळा संपला आणि आतां वनस्पती वर्गाला परिपुष्टी देणारें हिंव पडूं लागलें आहे ऋतुमानाच्या फेरफारामुळें कांहीं सामान्य दुखणीं वाढलीं आहेत परंतु हवा चांगली आरोग्यकारक होत आहे. पिकें यंदा सामान्य आहेत तथापि यापुढें चांगलीं सुधरतील असा भरंवसा आहे.

प्रसिद्धी-रा० रा० कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य, मुक्काम मुर्डी, पोस्ट हर्णै जिल्हा रत्नांगिरी यांच्या जाहिराती, आजच्या अंका सोबत वांटल्या जात आहेत. या जाहिरातींत दिवाळी करितां उंची अत्तरांच्या पेट्या आणि सदहू वैद्यराजांची नामांकित औषधें यांचा उल्लेख केलेला आहे तिकडे वाचकांनीं लक्ष्य पुरवावें.

नामदार चीफ कमिशनर साहेब येत्या गुरुवारीं आकोल्यास येतील आणि त्यांच्या तीन दिवसांच्या मुक्कामांत येथें चांगला उत्सव करण्यांत येईल.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं आपचे नागरिक रा० रा० गणोबा राघोबा हे पुत्रशोकामुळें विव्हळ असतांना प्लेगानें मरण पावले. हे पुष्कळ वर्षें मुनसिपाल सभासद होते आणि यांच्या शब्दाला चांगला मान असे. कर्ता सवरता पुत्र निवर्तल्या नंतर त्याचा आयुर्मार्ग लवकर संपला ही गोष्ट एका दृष्टीनें बरीच झाली !

### नोटीस

बेशर्मी तनसुखराय राधाकिसन मुनीम निसबत राधाकिसन 'रामदत्त किसनदयाळ' दुकान आकोला यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख ९।१०।१९०३ ची दिलेली दुकाना संबंधाची लेखी नोटीस पोंचली त्यांतील तुह्मी लिहिलेला मजकूर खोटा आहे, प्रथम माझ्याकडे तुमचें दुकान ७५ रुपये भाड्यानें होतें. त्याची मुदत गेल्या भाद्रपदांत संपतांच आह्मी तुमचें भाडें सालिना १२ रुपये केलें आणि संवत १९६० व १९६१ या दोन सालाबद्दलची ह्मणजे १९६० पासून १९६२ पर्यंत तुह्मी आपल्या वहीवर माझ्या हातून नोंदही करून घेतली आहे. भाद्रपद पासून दिवाळी पर्यंतच्या तुटक्या मुदतीचें भाडें मी त्याच दिवशीं पुरतें करून दिलें. तुमच्याशीं झालेल्या करारा प्रमाणें संवत १९६० सालचें सहामाही आगाऊ भाडें ६० रुपये येत्या कार्तिक शुद्ध १ ला पोंचतें करण्यांत येईल आणि साल अखेरीला बाकीचे ६० रुपये देण्यांत येतील. याप्रमाणें दोन वर्षें तुमची दुकान आह्मी भाड्यानें घेतल्या प्रमाणें १९६१ अखेर पर्यंत आमचे कडेस राहील. तुम्हा सारख्या दुकानदाराच्या वजनदारीला व सचोटीला तुमची नोटीस शोभत नाहीं. तुमच्या वृद्धापीला ही गोष्ट कमीपणा आणणारी आहे. तुह्मी विनाकारण नोटीस दिल्यामुळें या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. दुकान खालीं करण्यांत येणार नाहीं. सरकारी कोर्ट तुह्माला खुलें आहे. व आमची इतर जी नुकसानी होईल तीही तुह्माला भरून द्यावी लागेल. कळावें. सही ११।१०।०३ इसवी.

सही,

याकूब अबदूल गनी दुकान आकोला

तर्फे वहिवाटदार मालक मोतीसिंग आत्माराम दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

धुळें येथें प्लेगची सुरुवात झाल्यामुळें लोक बाहेर झोंपड्यांत जाऊन राहूं लागले आहेत. पुढील आठवड्यांत बहुतेक गांव रिकामा होईल. ट्रेनिंग स्कूलमध्यें उंदीर निघाल्यामुळें तें बंद करण्यांत आलें.

ए. डब्ल्यू. ह्यामिल्टन, कलकत्ता, हे पळून गेले असल्यामुळें त्यांस पकडण्याबद्दल कलकत्ता पोलीस कमिशनर साहेबांनीं २०० रुपयांचें बक्षिस लावलें आहे.

कोल्हापुरच्या राणीसरकार येत्या मकरा करितां काशीयात्रेस जाणार असल्याचें समजतें.

कालीकतचे सेशनजज मि. मिलर यांजकडे दोन राजे आणि इतर १८ असामी यांनीं लुटालूट केल्याबद्दल फिर्याद करण्यांत आली होती, परंतु पुरावा नसल्यामुळें खटला काढून टाकण्यांत आला.

काबूलचे अमीराचे दरबारातील कांहीं गुप्त बातम्या ब्रिटिश एजंटाचे कानीं गेल्याचें समजल्यावरून १० लोकांचीं डोकीं उडविण्यांत आलीं. आणि अमीरानें असा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे कीं, जो कोणी ब्रिटिश एजंटाशीं संबंध ठेवील त्यास देहांत शासन दिलें जाईल.

मेमोरियल डिप्लोमाटिक नांवाचे पत्रावरून असें कळतें कीं पर्शियाचे शहाचे द्वितीय चिरंजीव प्रिन्स मेलिक मान्सोर मिरोया हे राशियाकडे पळून जात असतां त्यांस पकडण्यांत आलें. ग्रांड वझीरच्या विरुद्ध कटांत त्यांचें अंग होतें. आणि इंग्लिशांचाही त्यांत कांहीं संबंध आहे असा तर्क आहे.

उपयुक्त वचनें.

१. मनुष्यास या जगीं स्वधर्मा वांचून सुख नाहीं.

२. राष्ट्रीय जागृतीला धर्मजागृती अवश्य आहे.

३. स्वधर्मा प्रमाणें वागलें असतां परमेश्वर प्राप्ति होते.

४. देव भक्तांस वश होतो आणि खरे भक्त देवास भजतात.

५. एकमेकापासून वेगळे होऊं नका तर स्वधर्मात एक जीव व्हा.

६. परमेश्वरावर, स्वधर्मावर, आपापल्या धर्मग्रंथांवर आणि धर्माधिकारी यांवर पूर्ण श्रद्धा असल्या वांचून कोणीहि धर्मनिष्ट व्हावयाचा नाहीं.

७. मनुष्याला जर धर्माचे वेगळे नियम बरोबर पाळिता येत नसले, तर त्यानें स्वधर्माचें मुख्य तत्त्व तरी सोडूं नये.

८. मनुष्य विस्तवास भिऊन जसा दूर राहतो तसें अधर्मानें वागणारां पासून रहावें.

९. जर एखाद्या माणसाचा बाप, भाऊ किंवा मुलगा मनापासून अधार्मिकाचा मित्र झाला तर, त्याला त्यानें एकदम दूर करावें. त्यांशीं संबंध ठेवूं नये.

१०. खरा धर्मनिष्ट जो आहे, तो पुण्य कर्में करूनही ईश्वराला भीत असतो, आणि धर्मलंड जो आहे, तो भयंकर कर्में करूनही परमेश्वरास भीत नाहीं; दुष्याधिकार भदानें उलट हंसत असतो.

११. कोणी ही मनुष्य आपल्या धर्मा प्रमाणें न वागतां जेव्हां तो पतित होतो तेव्हां मग त्याला कारण सांगावयास तो राहत नाहीं.

नामदार व्हाईसराय साहेब थोडक्याच दिवसांत पतियाळा, नाभा, झिंद व भावलपूर संस्थानांत जाणार आहेत तेथें नवाबास गादीवर बसविण्याचा समारंभ व्हावयाचा आहे तेथून स्वारी पार्शीयन गल्फमधील आरबी किनाऱ्यावरील सरदारांस भेटणार आहे.

मध्य प्रांतांमध्यें कामटी, हर्दा व गोंडिया येथें प्लेग सुरू झाला असून लोक झोंपड्यांत जाऊन राहिले आहेत.

कारवार पैकी होनावर म्युनिसिपालिटीचे व्हाईस प्रेसिडेंट मि० नारायणराव रामप्पा यास १८९४ मध्यें दिलेला रावसाहेब हा किताब काढून घेण्यांत आला.

आपली वासरें खाटकांस विकावयाची नाहींत असा नुकताच कलकत्याच्या गवळ्यांनीं निश्चय केला आहे, या निश्चयामुळें त्याचें जवळ सुमारें ३ हजार वासरें जमलीं, त्यांची चरण्याची सोय करण्यासाठीं तेथील बाबू सजनलाल यानीं आपली १५०० बिघे जमीन दिली आहे. गोरक्षणवाल्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा.

हिंदुस्थानला आतां १९८ कोट रुपये कर्ज आहे. १८७५ त फक्त १४२ कोटी रुपये कर्ज होतें. हिंदुस्थानांतून कोट्यावधि रुपये जात असून अजून कर्ज वाढतच आहे हिंदुस्थाना ! तूं कर्ज मुक्त कधीं होणार ?

कायद्याची सुधारणा.— वेश्या किंवा कुटिणी यांजपाशीं त्यांची नव्हे अशी सोळा वर्षांचे आंतील वयाची मुलगी असल्यास त्या बाया या मुलीच्या कायदेशीर वारस नसून ती मुलगी त्यानीं वाईट कामीं लावण्याकरितां बाळगली, असें समजून त्या बायांना गुन्हेगार ठरविण्याची इं. पि. कोडमध्यें दुरुस्ती करण्याबद्दलचा सरकारांत विचार चालला आहे असें समजतें.

हिंदुस्थानांतून जाणाऱ्या चहावर रशियानें जकात बसविल्यामुळें रशिया देशांतून हिंदुस्थानात येणाऱ्या कोट्यवधि टन राकेल तेलावर जकात बसविण्याचा विचार हिंदुस्थान सरकारानें चालविला आहे. मो०

मोठी मौज आहे.—सरकारनें हजार रुपये पर्यंत इनकमटाक्स माफ केला, पण त्याचा परिणाम बेळगांवास या कराची आकारणी जी होती त्याहून यंदा तीन हजारांनीं जास्त झाली आहे असें तेथील पत्रावरून समजतें. सरकारचें नशीब जोरावर आहे.

मि० आर. डी. टाटा नांवाच्या एका पार्शी धनाढ्य गृहस्थानीं एका फ्रेंच बाई बरोबर लग्न लाविलें, अशा रीतीनें झोरास्ट्रियन पंथाच्या लोकांनीं इतर धर्मीच्या लोकांबरोबर बेटीव्यवहार करणें रास्त आहे काय ?

सर्व्हियाच्या माजी राजास मारणाऱ्या लोकांवर इतर कांहीं आफिसरांच्या आग्रहावरून खटले करून त्या मारेकऱ्यांचा पुढारी कापनोव्होकोविच आणि दुसरा एक ऑफिसर यांस दोन दोन महिन्यांच्या शिक्षा देण्यांत आल्या आहेत पण हल्लींचा राजा त्या सर्वांस क्षमा करील अशी तिकडील लोकांस आशा आहे म्हणतात.

एका नेटिव घोडेवाल्यानें एका सोल्जरशीं मारामारी केली म्हणून त्यास ३ महिने सक्तमजुरीची कैद झाली. आणि ही शिक्षा रास्त आहे असें इंग्रज पत्राचें म्हणणें आहे. बंगलोरच्या एका सोल्जरानें खोटी हुंडी देऊन व्यापाऱ्याला फसविलें म्हणून त्याला ६ आठवडे साधी कैद झाली असतांहि ती भारी आहे असे त्यांचेच म्हणणें होतें. काळा गोऱ्यांतील हाच भेद होय.

युरोपियनांनीं नेटिवांस इतक्या वेळा मारलें कीं त्यातंबंधाच्या बातम्या वाचून वाचून युरोपियनांसही वीट आला आहे असें दिसतें. कारण या खर्चीत फेरबदल करण्याकरितांच जणू काय यूरोपियनांस नेटिवानें मारलें आहे अशी एक बातमी पायोनीयर पत्रात प्रसिद्ध झाली आहे.

आश्चर्यकारक शोध!

अमेरिकेंतील एका विद्वान् शोधकानें नवीनच असा शोध लाविला आहे कीं, रोगजनक असे कांहीं जंतु जसे असतात, तसे भीति म्हणजे प्रेम उत्पन्न करणारे असेही कांहीं जंतु शरीरांत असतात! तेव्हां त्या जंतुचा नाश करण्याची युक्ति निघाली म्हणजे, प्रेमानें आंधळे होणाऱ्या माणसांना ताबडतोब शुद्धीवर आणण्याला सांपडेल. प्रेमजनक जंतूंच नष्ट झाले म्हणजे प्रेम कसें टिकेल ? हा शोध खरा ठरल्यास व त्याप्रमाणें प्रेमजनक जंतूंचा नाश करण्याचा उद्योग साधल्यास ते जंतू उत्पन्न करण्याचाही शोध लागेल ! आणि तसें झालें म्हणजे मग हवें तेथें प्रेम उत्पन्न करण्यात व तें नाहींसें करण्यास सांपडेल ! या सुधारणेच्या काळांत काय होईल तेवढें थोडें !

हिंदुस्थानाचे हल्लींचे अधिपति ना० लॉर्ड कर्झन हे येत्या वर्षाच्या अखेरीस इराणी आखाताकडे सफर करणार आहेत अशी बातमी आम्ही प्रसिद्ध केली आहेच. आतां असें कळतें कीं ह्या स्वारींत आमचे मुत्सद्दी नामदार साहेब आरब लोकांचा जंगी दरबार भरवून त्यांस त्या आखातासंबंधानें ब्रिटिश सरकार कसें धोरण ठेवणार तें सांगणार ! हें कारस्थान नवीन नाहीं !

कोल्हापूर येथें कैदीलोक एजन्सी बंगल्याकडे एंजिन ओढून नेत असतां, वाटेंत घसरतीला तें अंगावर होऊन त्याखालीं दोन कैदी जाया झाले पैकीं एक लागलाच मेला.

नागपूर येथें— मागील आठवड्यांत ता० २६ रोजीं सेक्रेटरियट प्रेसमध्यें कांहीं मेलेले उंदीर सांपडले. सेक्रेटरियटमधील उंदीर निवडली जागा स्वच्छ करवून सफेदी करविली. पंजाबी लायनींत आजपर्यंत प्लेगनें ४० मनुष्यें मेलीं. त्या पैकीं शेकडा ९० रोमनक्याथोलीक मद्रासी व गोवानीज होते व बाकीचे पंजाबी व हिंदु होते म्हणून कळतें.

पेठ्याकडील नोकरांस चांगली दहशत बसण्या करितां परवां मुंबई पेठ्यातील आंतोनी नावाच्या सार्टरांला प्रेसीडेन्सी माजिस्ट्रेटानीं ७ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली. ह्या सार्टरानें लोकांची पत्रें फोडून त्यांतील नोटा काढून घेण्याचा कारखाना बरेच दिवसांपासून चालविला होता. तें पाप चव्हाट्यावर येऊन त्याजवर खटला झाला आणि त्याला सदर शिक्षा झाली.

चालूं सालच्या पहिल्या सहामाहीत इंडियन रेल्वेस पूर्वीच्या सालांतील या मुदतींत झालेल्या उत्पन्नापेक्षां अर्धकोट रुपये फायदा झाला, त्यांत ग्रे. इं. पे. रेल्वेस १९ लक्ष, औंध रोहिलखंड, बाबे बडोदे, व मद्रास रेल्वे प्रत्येक चार लाख, सौथ इंडिया व बेंगाल नार्थ वेस्टर्न प्रत्येकी सात लाख, आणि बर्मा रेल्वे तीन लाख परंतु राजपुताना माळवा रेल्वेस २१ लाख, इंडियन मिडलंड ७ लाख आणि ईस्टर्न बंगाल यांस तीन लाख रुपये तोटा आला. ना० टा०

युगांडा रेल्वेचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं, थामस कुक कंपनीनें रेल्वे व स्टीमरनें प्रवास करणाऱ्यास टिकिटें पुरविण्याचें योजिलें आहे.

नुकत्याच राजकीय कारणासाठीं म्हणून जे खून करण्यांत आले ते आर्मीनियन कमिट्यामार्फत झाले म्हणतात.

डेली क्रॉनिकलला असें कळलें आहे कीं मासिडोनिया येथील कत्तलीचा बंदोबस्त करण्याच्या उद्देशानें ब्रिटिश सरकारानें कान्स्टांटिनोपल येथें खलिता पाठविण्याचें निश्चित केलें आहे. व खलित्याच्या पाठबळा करितां एक ब्रिटिश स्क्वाड्रनही पाठविण्यांत येणार आहे.

स्वामी त्रिगुणातीत नांवाचे पंडित हल्लीं अमेरिकेंत वेदांतावर व्याख्यानें देत आहेत. स्यानफ्रान्सिसको येथें वेदांत सोसायटी स्थापण्यांत आली आहे. वेदांत शिक्षणासाठीं शाळाही सुरू करण्याचा स्वामीचा विचार आहे. स्वामी विवेकानंदानी सुरू केलेलें काम पुढें चालविण्याचा स्वामींचा विचार आहे. इकडील शहाणे लोक वेदांतात अर्थ नाहीं असें म्हणत आहेत !

ताईमहाराजांचा मृत्यु—कै० बाबामहाराजदत्तकप्रकरण व रा. रा. टिळक यांजवरील खटला बरेच दिवस चालला आहे हें आमच्या वाचकांस माहित आहेच. या खटल्यांतील मुख्य साक्षीदार ताईमहाराज यांना पुणें मुक्कामीं गेल्या बुधवारीं सकाळीं साडेआठ वाजतां देवाज्ञा झाली. या बाई बरेच दिवस आजारी होत्या. यांचा और्ध्वदेहिक संस्कार दत्तक बाळामहाराज यानीं केला. ही बातमी कळतांच कै. बाबामहाराज यांच्या मृत्युपत्राप्रमाणें मेसर्स टिळक, खापर्डे, व कुंभोजकर या पंचांच्या मार्फत रा. रा. केळकर व वैद्य यानीं डिस्ट्रिक्ट जज्जाकडे बाबामहाराजांच्या इस्टेटीची व्यवस्था करण्याविषयीं अर्ज केला. कोर्टानें इस्टेटीची व्यवस्था पाहण्यासाठीं क्यूरेटर नेमून नाझरा कडून इस्टेट रीतीप्रमाणें ताब्यांत घेतली. या अर्जाचा निकाल अजून झाला नाहीं. त्यासाठीं अवरंगाबादेस असलेले दुसरे दत्तक व बाळामहाराज यांनां डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून नोटीस करण्यांत आली आहे. रा. टिळकांच्या अपीलाच्या सुनावणीची तारीख २६ आक्टोबर नेमली आहे.

सेब्रोहंगेरियन सरहद्दीवर ओरिएंट एक्सप्रेसची व एका गुड्स् ट्रेनची टक्कर झाली. पुष्कळ उतारूंना इजा झाली आहे.

क्लेमेंटाईन व प्रिन्स फरडीनंड यांचीं मुलें उतारूंमध्यें होतीं. पण त्यांना कोणत्याही प्रकारचीं इजा झाली नाहीं.

आंग्लो इंडियनांचे कैवारी, डा. जॉन वाटेल्स हे मरण पावल्यामुळें त्यांचे फार नुकसान झालें आहे हे मोठे लेखक व वक्ते असून सरकारची बाजू झटण्यांत फार पटाईत होते.

कलकत्ता युनिव्हर्सिटी तर्फेनें बाबू भूपेंद्रनाथ बोस यास कायदे कौन्सीलचे सभासद नेमण्यांत आल्यामुळें कलकत्याच्या बड्या बड्या लोकांनीं त्यास मोठी मेजवानी दिली.

रंगूनच्या मुलांना "सलाम प्रकर्णांत" लष्करी तऱ्हेनें सलाम करण्या विषयीं हुकूम होऊन त्या प्रकर्णाचा निकाल लागला. ज्याच्या त्याच्या धर्मांप्रमाणें ज्यानें त्यानें सलाम, नमस्कार करावा हें ठीक पंतु या प्रकर्णांत अमुकच तऱ्हेनें सलाम, करणाविषयीं प्रकर्णें चाळावीत हें आश्चर्य आहे. तुका झणे उगे राहावें जें जें होईल तें तें पाहावें.

ट्रान्सवाल सरकारानें मजूरदारांच्या कमता ईमुळें रेल्वेचें काम तूर्त बंद ठरण्याविषयीं ठराव केले आहेत.

नामदार गव्हरनर जनरल साहेबे आणि काउन्सीलचे मेंबर यांचे पगार वाढविण्या विषयीं गव्हरनर जनरल साहेबांनीं स्वतःच शिफारस केली होती, परंतु ही गोष्ट पार्लमेन्ट सभेच्या हातीं असल्यामुळें मंजुरी देण्यांत येत नाहीं असा स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं निरोप पाठविला.

गेल्या आठवड्यांत सोलापुरास तीन चार दिवस रोज ३४ इंच पाऊस पडून अगदीं गर्दी उडाली. पावसामुळें बरीच पडापड व गळागळ झाली शिवाय वराच्या भिंती पडून २ माणसें त्यामुळें दगावलीं. कोणावर खटले होतात काय पहावें!

## नोटीस

शेठजी राजेश्री नथमल सोमानी साहू, दुकान आकोला यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची दुकान आकोला ताजनापेठेंतील तुह्मास कार्तिक शुद्ध १ संवत १९६० पर्यंतच्या करारानें भाड्यानें दिलेली आहे. त्या कराराची मुदत संपत आली आहे. आतां पुढील सालाबद्दल १२ महिन्यांचें भाडें ४०१ रुपये नगदी आह्मास मिळालें पाहिजे. जर तुह्मास दुकान तुह्माक डेच ठेवावयाची असेल तर संवत १९६० सालाबद्दलची भाडेचिठी करून देऊन ४०१ रुपये आगाऊ ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांत आमच्या शेगांवच्या दुकानीं आणून द्यावें. ही गोष्ट तुह्मी पतकरीत नसल्यास दुकान खाली करून कार्तिक शुद्ध १ रोजीं आमच्या हवालीं करावें. या नोटिशी प्रमाणें तुह्मी आगाऊ रुपये व भाडेचिठ्ठी वर लिहिलेले करारा प्रमाणें न दिल्यास आह्मी हें दुकान दुसऱ्यास भाड्यानें देऊं आणि तुह्मास या नोटिशीच्या खर्चा सुद्धां व इतर नुकसानी सुद्धां दुकान खाली करून द्यावें लागेल कळावें तारीख ४ आक्टोबर १९०३ इ.

सही (मारवाडींत)

गणेशदास भिवराज दुकानचा वहिवाटदार मालक हरिबक्ष भिवराज दुकान शेगांव.


## जाहिर खबर

## खरेदी करा!

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असुन इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपलीस्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### सॉल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ........................४०

१९ ,, हंटिंग.........................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०

१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारेंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८

१९ ,, सेकंद कांट्यासह..............१०

१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलें ..............१२

१९ ,, हाफ हंटिंगचें...............१०

१९ ,, हंटिंगचें ...................१०

१४ ,, रिस्ट वॉच ...................१०

### इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओंपन फेस............२०

१९ ,, हंटिंग....................२०

१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०

१४ ,, हंटिंग...........................३५

१८ व १९ ,, ओपनफेस ...........३०

१९ ,, सेकंद कांट्यासह...........३२

१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेले ...............३६

१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५

१९ ,, हंटिंग .....................४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

### सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

१ हार्नबी रोड, मुंबई



ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष व इतर धातपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रमेह, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खर जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांचा कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखानें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षें आमरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असुन त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यास खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी


## बक्षीस

हरवलेला किंवा चोरीस गेलेला दागीना

(सांपडून देण्यासाठीं)

आमच्या बंगल्यांतून थोडे दिवसापूर्वीं एक दागिना हरपला आहे. तो दागिना ह्मणजे सोन्याचा जडावाचा ब्रूच. हा लेडींचा दागिना आहे. यांत फिक्या हिरव्या रंगाचा पारदर्शक नीलमणी आठ आणी एवढा पण चौकोनी असा बसविला आहे. हें न विलायती असून दागिन्याची किंमत १०० रुपये अंदाजानें आहे.

दागिन्याची बरोबर माहिती कोणी लावून देईल किंवा कोणी तो आणून देईल तर त्याला चांगलें इनाम नक्की देऊं आणि हा दागिना कोठून व कसा आणिला या विषयीं कांहींच विचारणा करण्यांत येणार नाहीं असें आह्मी आश्वासन देतों.

आकोला १८।९।०३.

(सही) पी. क्रे.

असिस्टंट कमिशनर.


### स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्ड्स वगैरेंना लागणारे व मुंबईतील

इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

**धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.**

जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

त्वरा करा ! ! अपूर्व लाभ ! ! !

**अशी अमोल संधी**

पुन्हा येणार नाहीं.

## श्री शनी प्रासादिक औषधालय कंपनी

**खामगांव आठवडे बाजार**

खालीं लिहिलेली सर्व प्रकारचीं औषधें व पुस्तकें, संगीत नाटकें किफायतीनें मिळतील. ४१ आणा पाठवून दयाटलाग मागवा. पुष्कळ माल घेऊन सर्टीफिकीटेंही मिळालीं आहेत. आम्ही खरे सांग्याची बक्षीसेंही देण्याची सोय ठेविली आहे. फक्त जानेवारीचे आंत बेणारास व पांच रुपयाचे वर घेणारास ½ किंमत अगाऊ घेऊन बाकी राहिलेल्या किंमतीबद्दल व्ही. पी करूं. पांच रुपयाचे वर माल व्ही पीनें पाठविला जाणार नाहीं.

औषधाची यादी व किंमतः—

| | रु. आ. |
|---|---|
| डोळ्यांत अयरा फुलकोंब लाली असल्यास. १ डबी | १—० |
| गरमीचे चट्यास मलम गुण तीन दिवसांत. डबी | १ |
| गर्भ पडल्यास मलम डबी. | १ |
| गजकर्णास मलम डबी | |
| कान ठनकत असल्यास केसरादि अर्क बाटली | ०४ |
| कान फुटून पूं रक्त पाणी वहात असल्यास बाटली | ०४ |
| मुळव्याधीवर मलम डबीला | ०४ |
| डोळ्यांतील खवा नाहींसा करणाऱ्या अर्क बाटलीस | ०८ |
| जांघेतील बद झाल्यास मलम डबी | १ |
| महामारीवर रामबाण १६ गोळ्यास | १ |
| रंगाची गाठीवर रामबाण मलम डबी | १ |
| तोंडावरलें मुरुम नाहींसे करणारें मलम डबी | ०८ |
| घरांतील उंदीर नाहींसे करणारे औषध तोळ्यास | ०४ |
| घरांतील ढेंकूण बंद करणारे औषध तोळ्यास | ०४ |
| दंतमंजन डबीला | ०४ |
| विंचु उतरण्यास अर्ध्या तासांत गुण मुळीस | १ |
| हिवावर १६ गोळ्यास रु. | १ |
| काळ्या रंगाचा गोरा रंग करणारें तेल बाटलीस | १ |

हीं वरील सर्व औषधें खालील पत्यावर मिळतील. उत्तराकरितां टिकीट अर्धा आण्याचें पाठविलें पाहिजे त्याचांचून उत्तर मिळणार नाहीं.

**पत्ता—दयालदास मोतीदास झेंडे. म्यानेजर—श्री शनी प्रासादिक कंपनी. आठवडे बाजार. खामगांव ( वऱ्हाड )**

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

———

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years'. Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु. १॥.

तापावर एग्युनीक्वर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे आतिल सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुग इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सि. पी.

मुंबई बँकचीं सान्हिग्स बँक

या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षांचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

### जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाठव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. छूटें लवकर. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मा. सह बक्षिस.

का०वा० लेले वाई

अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त ! !

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षांमी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. रा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी. नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडहिंग्लज.
० कोल्हापूर

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दांताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक किस्मत कदादां है हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ·।।·

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, पेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडें होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतांनी फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No, N 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी. आगाऊन दिली पाहिजे.
कीरकोळ अंकास..........................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........०१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....०१

Mofussil ... ...
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ......................... 2 as

Advertisement
below 10 lines ......2 R
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 19 OCTOBER 1903 NO 40

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १९ माहे आक्टोबर सन १९०३ इ० अंक ४०

### वधू पाहिजे.

वराचें वय १९ वर्षे. आंगानें सुदृढ वर्ण गोरा. महिन्याचें उत्पन्न ४० रुपये आई बाप व भाऊ आहेत. वधू अकरा बारा वर्षाची निरोगी असावी रुपानें कुरुप नसावी. वराची जास्त माहिती पाहिजे असल्यास तीः—

गोविंद भास्कर ओक.
सेक्रेटरी डि० बोर्ड आकोला.
यांचेकडून मिळेल.

---

त्वरा करा !! अपूर्व लाभ !!!

### अशी अमोल संधी

पुन्हा येणार नाहीं.

### श्री शनी प्रासादिक औषधालय कंपनी

खामगांव आठवडे बाजार

खालीं लिहिलेलीं सर्व प्रकारचीं औषधें व पुस्तकें, संगीत नाटकें किफायतीनें मिळतील. ०१ आणा पाठवून क्याटलाग मागवा. पुष्कळ माल खपून सर्टीफिकीटेंही मिळालीं आहेत. आम्ही खरे सोन्याचीं बक्षिसेंही देण्याची सोय ठेविली आहे. फक्त नानेवरीनें आंत घेणारास व पांच रुपयाचे वर घेणारास $\frac{1}{4}$ किंमत अगाऊ घेऊन बाकी राहिलेल्या किंमतीबद्दल व्ही. पी करूं. पांच रुपयाचे वर माल व्ही. पीनें पाठविला जाणार नाहीं.

औषधाची यादी व किंमतः—

| | रु. आ. |
|---|---|
| डोळ्यांत अयरा फुलकोंब लाली असल्यास. १ डबी | १—० |
| गरमीचे चट्टयास मलम गुण तीन दिवसांत. डबी. | १ |
| भद पडल्यास मलम डबी. | १ |
| गजकर्णास मलम डबी | |
| कान ठनकत असल्यास केसरादि अर्क बाटली | ०४ |
| कान फुटून पूं रक्त पाणी वहात असल्यास बाटली | ०४ |
| कुळ्याचीवर मलम डबीला | ०४ |
| डोक्यातील उवा नाहींशा करणाऱ्या अर्के बाटलीस | ०८ |
| काखेंतील बद झाल्यास मलम डबी | १ |
| महामारीवर रामबाण १६ गोळ्यास | १ |
| प्लेगाची गाठीवर रामबाण मलम डबी | १ |
| तोंडावरलें मुरुम नाहींसे करणारे मलम डबी | ०८ |
| घरांतील उंदीर नाहींसे करणारे औषध तोळ्यास | ०४ |
| घरांतील ढेंकूण बंद करणारे औषध तोळ्यास | ०४ |
| दंतमंजन डबीला | ०४ |
| बिंचू उतरण्यास अर्ध्या तासांत गुण गुळीस | १ |
| हिवावर १६ गोळयास रु. | १ |
| काळ्या रंगाचा गोरा रंग करणारें तेल बाटलीस | १ |

हीं वरील सर्व औषधें खालील पत्यावर मिळतील. उत्तराकरितां टिकीट अर्ध्या आण्याचें पाठविलें पाहिजे त्यावांचून उत्तर मिळणार नाहीं.

पत्ता—दयालदास मोतीदास झेंडे.
म्यानेजर—श्री शनी प्रासादिक
कंपनी आठवडे बाजार.
खामगांव ( वऱ्हाड )

---

### नोटीस

नोटीस खाली सही करणार किसन तुळशीराम अज्ञान पालन करणार आई गंगाबाई जवजे तुळसीराम अगरवाले दुकान जळगांव तालुके मजकूर याजकडून सुजातखा वल्लद मुरादखा मुसलमान राहणार धानोरा तालुके जळगांव जिल्हा आकोला यांस नोटीस देण्यांत येतें कीं तुम्हास माझे वतीनें आमचें दुकानचें दर्णे घेणें बद्दल व तडजोडी बद्दल कुलमुखत्यारनामा दिला होता त्यांत तुम्ही आज दोन महिने पासून दुकानावर येत नसून दुकानदारीचे व्यवस्थकडेस लक्ष देत नसल्यामुळें दिवाणी कोर्टातील मुलकी कोर्टातील नोटीसा समन्स आमचें नावचे येऊन पलट जातात त्याज बद्दलची नफा नुकसानी आमचे वर येत आहे तुमचे नें वेळेसीर साधले जात नाहीं असे दिसून आले आणि तुम्ही येणें ही बंद केलें असे चिन्हा वरून तुमचेवर आमचा भरंवसा नाहीं वरून तुम्हास नोटीसीनें सुचविले जातें कीं तुमचें मुकत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केलें आहे आज तारखे पर्यंत तुम्ही जी दुकानची तडजोड वगैरे केली असेल त्याज बद्दलचा हिशेब आठ दिवसांत घेऊन दुकानावर येऊन समजून द्यावें तुमचें दोन महिन्यांत येणें जाणें बंद आहे त्यात तुम्ही कोणाकडून कर्ज वगैरे काढल्यास त्याजबद्दल जबाबदार मी नाहीं तसेंच कोणा आसामीची तडजोड करून पावती केल्यास तेही मजला कबूल नाहीं त्यास तुम्ही नोटीस पावले दिवसा पासून १५ दिवसांचे आंत येऊन हिशेब समजून द्यावा नोटीस दिली.

सही
किसन तुळशीराम अज्ञान पालन
करणार आई गंगाबाई जवजे
तुळसीराम अगरवाले दुकान
जळगांव निशाणी बागडी

---

### नोटीस.

नोटीस देवापा वा मल्लापा वाणी मौजे निमकर्दे तालुके बाळापूर यासी नोटीस देणार रावजी वा रामजी व उदेभान वा। भिवसन वस्ती मौजे आवर तालुके खामगांव कारणें नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही आवर येथील नारायण आपावानी याचे घर छपर खरिदी घेतलें असून तेंच घर मौजे मजकूर कर जानापा व खोजापा व गजापा या तिघास राहाण्यास दिलें असून सालमजकुरीं वरसातींत बैलाकरितां आमचे उभयतांचे धाब्याचे नेटून खिडक्या इत्र तोंडावर छपर बांधले आहे करितां आपणास कळविण्यांत येतें कीं, ते नवीन बांधलेलें छपर तुम्ही काढावें. अगर या त्रिवर्गास सांगावे जर न काढाल तर त्या पासून आवर्षा सवली मुळें आमचो नकसान झाल्यास तुमास आमचे उभयताचे इमारतीचें नुकसान देणें भाग पडेल पुढें तकरार ऐकिली जाणार नाहीं कळावे तारीख १५।१०।०३ इ०

सही
रावजी वा रामजी पाटील निशाणी
उदेभान भिवसन दस्तूर खुद्द.

---

नोटीस.

बेशमी बालु मुली बाप पापया व राजु मुरली बाप पापया या दोघेस.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे मालकीचे घर आकोले ताजनापेठेंतील हनुमान वस्ती जवळ असलेलें मी जीवंत असे पर्यंत तुम्ही कोणाजवळ गहाण वगैरे ठेऊन कर्ज वगैरे काढूं नये. मी मेल्यावर त्या घराची वाटेल तशी अवस्था करण्यास तुम्हास अधिकार आहे. मी असे पर्यंत कोणा पाशीं घर गहाण ठेविल्यास ठेवणारा व ठेवील तो असे दोघेही जबाबदार धरले जाल. माझी इस्टेट व घर किंवा मी जबाबदार होणार नाहीं. कळावे, तारीख १५।१०।०३ इसवी.

सही.
पापमा मर्द पापया बेडर अकोले
निशानी खुद्द हातची बागडी.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, माझ्या मुली नामे बालु बाप पापया व राजु बाप पापया राहणार आकोले ताजनापेठ, ह्या माझे ताजनापेठ आकोले येथील हनुमान वस्तीजवळ असलेलें घर कोणापाशीं गहाण वगैरे ठेऊन कर्ज वगैरे काढतील तर त्यास कोणी देऊं नये; दिल्यास ज्याचा तो जबाबदार राहील मी व माझी इस्टेट घर वगैरे राहणार नाहीं. कळावें तारीख १५।१०।०३ इसवी.

सही.
पापमा मर्द पापया बेडर आकोले
निशाणी खुद्द हातची बागडी.

---

### कर्मयोग

( रा. रा. व्यंकटराव कृष्ण-देसाई यांचा निबंध ) नंबर ३

९ बांधवहो, विचार करा. जलद प्रवासाची इतकी उत्तम सोय असूनही मनुष्य असंतुष्ट आहे बरें, जी गोष्ट घडण्यास एक वर्ष लागत होतें ती एक दिवसांत करितां येते यामुळें कांहीं तरी मानसिक उन्नत्ति झाली काय? किंचित ही नाहीं या वरून आपल्या लक्षांत आलें असेल कीं कितीही विषय प्राप्ति तरी, ते आतां पुरे, असें तर वाटतच नाहीं, पण उलट ज्यास्त हॉव मात्र सुटते. यामुळें मनुष्य नेहमी कंटाळलेला व असंतुष्ट राहतो व राहील. कारण या सर्व वस्तूचे ठिकाणी शुद्ध आत्मा दिसत नाहीं. जीवाला तर केवळ सुख पाहिजे. तें सुख आत्माच आहे. अर्थात् या आत्म्याची प्राप्ति झाल्या शिवाय मनुष्यास खऱ्या सुखाची प्राप्ति होणें नाहीं. विषयांत खरें सुख असतें तर त्याचा कंटाळा आला नसता. म्हणून वर लिहिल्या प्रमाणें कर्माचरण केल्या पासून संतोषाच्या प्राप्तिची आशा करणें नको.

१० अखेरीस मनुष्य थकून जातो, विषय प्राप्ति होण्याचा संभव नसल्यामुळें तो असंतुष्ट राहूं लागतो व मग त्यास वाटूं लागतें कीं "अरे, हें काय? इतकी तरफड ही शेवटीं 'येरे माझ्या मागल्या बहालच आहे" त्याचें मन उलट खातें. व पूर्वीच्या अनुभवानें त्यास कळूं लागतें कीं विषयांची तृप्ति म्हणून कधीं व्हावयाचीच नाहीं. नंतर हळू हळूं त्यास जगाचा कंटाळा उत्पन्न होतो व कांहीं काळानें तो इतका वाढतो कीं तो मनुष्य जगांतून पळून जातो व एकांत वासाचें सेवन करितो. तेथें ही त्यास मनाची शांति अथवा संतोष मिळत नाहीं व अनुभवानें त्यास असें कळतें कीं, विषयापासून पळून गेल्यानेंच वासना नष्ट होत नाहीं, विषयांचे ठिकाणीं असलेली आसक्ति नाहींशी झाली पाहिजे, नाहीं तर जंगलांत देखील आसक्तिमुळें विषयांची आठवण पाठलाग केल्या शिवाय राहणार नाहीं.

११ अशा स्थितींत, काय करूं काय न करूं, अशी मनुष्याची बाबरगुंडी उडते व तो हतवीर्य होतो व "निदानीचा पांडुरंग" या संतवाक्याची त्यास आठवण होते व तो या पांडुरंगासच "देवा, आतां काय करूं" असें काकुळतीनें विचारितो. तेव्हां दीनदयाळ प्रभु त्यास सुचवितो कीं,

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति
॥ ४ ॥ गी. अ. ३

कर्म टाकल्यानें पुरुष कर्मापासून मुक्त होत नाहीं त्याच प्रमाणें केवळ संन्यासानें ही तो सिद्धि पावत नाहीं. कर्म करणें तें वासना-

रहित केले पाहिजे. शारीरिक क्रिया बंद ठेविल्यानें कर्मबंधा पासून मुक्ति मिळत नाहीं. वर प्रमाणें वैराग्याचा उदय झाल्यावरही कर्माचरण केलेंच पाहिजे. कर्माचरणानें मुक्ति मिळते; पण मनुष्यवस्ति सोडून जंगलांत जाणें याहून विशेष महत्वाचा तत्वावलंबनानें ती मिळते. त्या तत्वाचा बोधही तोच दयाळु प्रभु त्याप करून देतो व मग त्याला समजूं लागतें कीं कर्म तर केलेंच पाहिजे पण हेतु बदलला पाहिजे.

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् २५
गी. अ. ३

पहा बरें, किती पूज्य हेतु हा. स्वार्थाविषयीं विरक्त राहून लोकांच्या कल्याणाकरितां कर्म करावें असं भगवान ह्मणतात.

१३ कर्म न करितां स्तब्ध राहण्यानें कर्मबंध नाहींसा होत नाहीं, ज्ञात्यानें लोकोपयोगाकरितां कर्म करावें वगैरे पूर्वोपदिष्ट उपदेश ज्या दयाळु भगवंतानें केला तोच अशा अडचणीच्या प्रसंगीं काय करावें हें सूक्ष्मतर तत्व त्यास सांगतो. भगवान् ह्मणतातः—

कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्म-फलहेतुर्भूर्मा ते संगोस्त्वकर्मणि ॥४७
गी. अ. २

बाबारे, कर्म करण्याचाच तुझा अधिकार आहे, कर्माच्या फलास नाहीं, कर्म फलाच्या उद्देशानें कर्म करूं नको अथवा कर्म न करणाराही होऊं नकोस "

१४ या प्रमाणें तो मनुष्य वागूं लागला ह्मणजे मात्र पूर्ण स्वार्थत्याग होतो. कर्माचें फळ कोणत्याही प्रकारानें भोगण्याची इच्छाच तो समूळ नाहींशी करितो. या जगांत कर्माचें फळ नको, परलोकांत नको, लोकांची प्रीति अथवा कृतज्ञता देखील नको. मग राहिलें तरी काय? फलापेक्षां रहित कर्म करण्याचेंच शिलक राहिलें. अशा कर्मकर्त्यास सिद्धिची अथवा असिद्धीची काय परवा राहील? त्याच्या मनाची समता झाली. अशा समतेसच "योग" ह्मणतात.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती आश्विन वद्य १४ शके १८२५

---

## स्वागत.

नामदार जे. पी. ह्युवेट साहेब चीफ कमिशनर यांची स्वारी गेल्या गुरुवारीं सायंकाळीं मेल गाडीनें उमरावतीहून आकोल्यास आली. साहेब बहादूरा बरोबर त्यांचे दोन सेक्रेटरी आहेत आणि आमच्या प्रांताचे कमिशनर मे० हेअर साहेब हेही बरोबरच फिरत आहेत. साहेब बहादूरांच्या स्वागता निमित्त नामी दीपोत्सव करण्यांत आला. स्टेशनाच्या प्लाटफार्मला पाय लागतांच एक सुंदर गालिचा बुटांच तळव्यास आपल्या शोभायमान रंगांनीं रुळवूं लागला आणि चालतांना त्याचा मृदुपणा बुटांस चेंडू सारखी सौम्य उशी देत असे. गाडीच्या खालीं उतरतांच साहेब बहादूरांच्या गळ्यांत मोठमोठे पुष्पहार घातले. पुष्पहारानें त्यांस अलंकृत करण्याचा श्रेष्ठ मान रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनं एम. ए. पेनशनर एजुकेशनल इनस्पेक्टर व विद्यमान व्हाईस-चेअरमन, मुनसिपालिटी आकोला यांच्याकडे होता. त्यांच्या मागोमाग पुष्पगुच्छ, गुलाब अत्तर इत्यादींनीं साहेब बाहादूरांस सुप्रसन्न व सुगंधित करण्याचा अधिकार रा० रा० रावराव गोपाळ देशपांडे अडगांव मुगुटराव बळवंत राव देशमुख, उगवें आणि आनंदराव हरसिंग देशमुख, बारशीटाकळी या जमेदार मंडळीकडे होता. वरील पुष्पहार, गुच्छ, अत्तर गुलाब इत्यादि द्रव्यें वाटण्या साठीं अधिकृत गृहस्थांच्या हातीं देण्याचा सन्मान रा० रा० केशवराव गोविंद दामले एल. एल. बी. व व्हाईसचेअरमन जिल्हा बोर्ड व नारायणराव काशीनाथ दाते बी. ए. वकील व सेक्रेटरी, मुनसिपाल बोर्ड आकोला यांच्याकडे होता. मुनसिपल सभासद व जिल्हा बोर्डाचे सभासद व इतर निमंत्रित सभ्य गृहस्थ यांच्याकडे पुष्पवृष्टी करण्याचा अधिकार होताच परंतु त्यांस गालिच्यावर दुतर्फी उभें राहूं दिलें नाहीं, निरनिराळ्या रमणीय वेलींच्या कुंड्यांनीं मर्यादित केलेल्या प्रभावळींत फक्त अधिकारी लोक उभे राहिले आणि ह्मणूनच ही मंडळी दूर वर दर्शनसुख घेत तटस्थ राहिली. आणि त्यांच्या प्रफुल्लित नेत्रकमलांनीं नामदार साहेबांस मुग्ध व मनोहर सलामी दिली. आकोला स्टेशनच्या विशद्वारावरील स्वागतदर्शक अभिवचनें उज्वल दीपांनीं वाचून दाखविल्या नंतर आणि प्रभावळींतील अधिकाऱ्यांशीं हस्तस्पर्श केल्या नंतर नामदार साहेब मागील दादराकडे येऊं लागले. त्या स्वागताच्या अत्यानंदांत पुष्पहारादि अलंकार देणाऱ्या श्रेष्ठ श्रेष्ठ लोकाग्रणींस कुशल प्रश्न विचारण्याला किंवा तसेच लौकिकी शिष्टसंप्रदाय पाळण्याला नामदार साहेब विसरले असे कित्येकजण ह्मणतात पण त्यांच्या त्या आनंदी व प्रसन्न मुद्रेनें व पुढें पुढें दिसणाऱ्या नानाविध दीपांच्या आनंदोद्गारांनीं ती सर्व कमतरता दूर केली. इतकेंच नाहीं तर त्या भव्य व सुंदर दादराला सोडून नवीन निर्माण केलेल्या गालीचाच्या पायवाटेनें जाण्याची मौज इतकी रमणीय वाटली कीं साहेब बहादूर खरे खरेंच आपल्या रथाजवळ गेले आणि त्यांनीच काय पण सर्व प्रेक्षकांनीं ही नवी पायवाट करणाऱ्या कल्पकाच्या चातुर्याचें आश्चर्य केलें. नेहमींचा तो सुंदर दादर या अपमानामुळें नामदार साहेबांस शाप देईल पण तो दादराचा चढ उतार करण्याचे परिश्रम पडले नाहींत व सामान्यजनांनीं क्षुण्ण केलेल्या त्याच्या त्या पायऱ्या सजमान्य नामदारांस चढाव्या उतराव्या लागल्या नाहींत हा विशेष त्या निर्जीव पामरास कोठून कळणार!

अशा रितीनें नामदार साहेब येथील गिरिजावराच्या पूर्वभागाच्या सरकारी बंगल्यांत गेले. वाटेनें त्यांच्या त्या रथाला रस्त्याच्या दोही बाजूंच्या उज्वल दीपांनीं स्वागत केलें आणि त्या वेळचा तो देखावा फार रमणीय दिसला.

गुरुवारा पासून काल दोन प्रहरापर्यंत नामदार चीफ कमिशनरांचा बाहुटा फडकत होता. तेथील तंबू, कृत्रिम बगिचे, व इतर आरामकारक उपसाहित्यें यानीं त्या स्थळास मोठी रमणीयता आली होती. आकोल्याच्या प्रेमळ स्वागतसमारंभाचें स्मरण नामदार साहेबांस चिरकाल राहो एवढेच आमची मनीषा आहे.

---

## संस्मरण

या स्वागताचें स्मरण ठेवण्याविषयीं नामदार चीफ कमिशनर यांस आह्मी मुद्दाम विनंती करितों. विनंतीचें कारणें असें कीं हें स्वागत आकोल्यास मोठ्या संकट समयीं करण्यांत आलें आहे आणि तें इतकें उत्कृष्ट झालें आहे या संबंधानें आमच्या या स्वागता करील चालक मंडळीचे आह्मी नागरीक फार फार आभारी आहोंत. या स्वागतानें आह्मी नामदार साहेबांस आपलेसे करूं पहात आहों. त्यांनीं मात्र या स्वागताच्या भपक्यावर व शोभेवर फारसा भरंवसा ठेऊं नये आणि अंतस्थ स्थिती तशीच मनोहर असेल असें मानूं नये. आमची श्रीमंती गालिचा पायमार्गा खालीं तुडविण्या पर्यंत पोंचलेली नाहीं. आमच्या दरबारांतील बैठकीचा मुगुटमणी ह्मणजे गालिचा असतो. परंतु आकोल्यास तो असा लोळविला ह्मणून त्याचा सांप्रदायिक मोठेपणा कोठें गेला नाहीं; फक्त त्याचा उपयोग तसा करण्याकडे लघुता येतो. स्टेशनावर जमलेल्या सद्गृहस्थांच्या दर्शनीय आनंदी मुद्रेवर व अट्टहासश्रीवर विश्वास ठेऊं नका. त्यांच्या त्या मनांत प्लेगाचा काहूर किती तरी उसळत असेल. गांव खालीं होत चालला आहे. रोजच्या मृत्यूंनीं लोक गडबडले आहेत. येथील कांहीं लोकांचे आप्त घरें खालीं न केल्या बद्दल तुरुंगांत शिक्षेचे १५ दिवस काढीत आहेत. हे सातजणच तुरुंगांत आहेत पण त्यांच्यामुळें लोकसमुच्चय फार उद्विग्न, दुःखी कष्टी, व निराश्रित झालेला आहे. ज्याच्या त्याच्या मनावर या शिक्षेची दहशत बसली आहे, स्टेशनावरील लहानशा चमूनें आकोला होत नाहीं ही गोष्ट नामदार साहेबांच्या लक्ष्यांत आली असेल असें आह्मी समजतों. इंडियन लोक तमासगीर खरे; त्यांस मौज पाहण्याची मोठी हौस तरी देखील, कांहीं गूढ कारणामुळें ह्मणा, किंवा बंदोबस्तामुळें ह्मणा आकोल्याचा बाजार बुणगा समूह स्टेशनावर किंवा रस्त्यांच्या बाजूंनीं गोंधळ व गोंगाट करीत नव्हता. स्टेशनाची रमणीयता ज्या सद्गृहस्थानीं परिश्रमानें उभारली त्यांच्या हातून एन वेळेवर बंदोबस्त राहणार नाहीं असें वाटल्या वरूनच कीं काय कोण जाणे, पोलिस सुपरिंटेंडेंट आपल्या लवाजम्यानिशीं स्टेशनावर दाखल झाले आणि पूर्वीं पासूनच निवडक गृहस्थांस परवाने देण्यांत आले होते ह्मणून स्टेशनावर फार गर्दी उडाली नाहीं, आणि नीटनेटका पोलिसांचा बंदोबस्त झाला ह्मणून या निवडक गृहस्थांनीं निमूटपणें आपलीं दोन पातें यष्टी प्रमाणें एकास्थळीं प्रतिष्ठित केलीं. नामदारांच्या सन्मानार्थ होत असलेल्या दिवाळी सारख्या उत्सवानेंच आह्मी दिवाळी पाहत आहों. बाकी लोकसमूहाला खरोखरची दिवाळी कशी तरी कष्टप्रद जाईल. लोकांनीं तोंडें ह्मणून मुनसिपल सभासद्, बोर्डाचे सभासद व हस्तक अधिकारी आपल्या पुढें पुढें गोडगोड बोलतील पण त्यांचे गोड शब्द लोकांच्या मनाचे आरसे नाहींत. हें नामदार साहेब विसरणार नाहींत असें आह्मी ह्मणतों. या स्वागतासाठीं सात आठशे रुपये खर्चीं पडले असतील पण हा पैसा कोठून व कसा आला याचा विचार नामदार साहेब करणार नाहींत अशी आह्मी उमेद बाळगतों. प्लेगाच्या वेळीं गरीब लोकांस झोपड्यांची व इतर तऱ्हेची मदत द्यावी ह्मणून वर्गणी गोळा करण्यासाठीं रा० रा० रुस्तुमजी साहेब यांच्या अध्यक्षते खालीं जाहिरसभा भरली होती तेव्हां देखील सात आठशे रुपयांचे वर्गणीचे आंकडे पडले नाहींत ही गोष्ट ध्यानांत धरण्या सारखी आहे. वरील नानाविध विसंगतपणा लक्षात आला ह्मणजे नामदार साहेबांस वाटेल कीं हा स्वागताचा समारंभ खरोखरच नको होता पण तें कसेंही असो, आह्मी अत्यादरानें नामदारांचें स्वागत केलें आहे. त्याचा त्यांनीं स्वीकार केला आहे व ते या पुढें आमचे बनले आहेत तेव्हां त्या पासून आमचे भावी लाभ पुष्कळ आहेत असें आह्मी मानतों. महपुरुषांचें आगमन ह्मणजे पुरःस्फूर्तीचें प्रसादचिन्ह होय!

---

'सुदामा' ह्मणून एक कुशल व विनोदी लेखक आपले त्रोटक लेख 'विविधज्ञानविस्तारा'त छापीत असतात. त्यांनीं आपली लेखणी गेल्या खेपेला 'गणेशचतुर्थी' वर झाडली. हा लेख पूर्वीच्या लेखांशीं फार विसदृश दिसतो.

हे सुदाम्याचे पोहे फार नीरस वाटतात. श्रीगणेशाची उपहासपर उत्पत्ति, त्याच्या वाहनाचा जन्मवृतान्त व इतर शेरेदोरे या मासिक पुस्तकारांनीं प्रकाशित केले नसते तर त्यानी लोकांवर उपकार केला असता. थट्टा अमर्याद आहे. त्यांतील व्यंजना फारच उत्तान आहेत. सर्वच भाग कंटाळवाणा, उद्वेगकारक व मनाला त्वेष आणणारा आहे. सुदाम्याची आराध्य गणपती विषयीं ही भक्ती पाहून वाईट वाटतें आणि चांगले आनंददायी लेख लिहिणारी लेखणी अशा प्रकारें शिणवूं नये. ह्मणून आह्मी त्या सुदाम्यास विनंती करितों.

---

## OURSELVES

Our subscribers will, we hope, allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudingly As our offices will be closed for these days there will no paper issued on the 26th. October.

---

**The Berar Samachar**

MONDAY OCTOBER
19 1903

---

The expansion of agriculture in our province does not point to a history

of a healthful progress and prosperity. There are signs of degeneration. The canker is at the very bottom of a real development in agriculture. People are being thrown in large numbers upon land and many persons pursue agriculture as the only means of livelihood. There is no improvement in the processes of cultivation; and no investments are made with a view to bring agriculture to a point of excellence. Rich people invest money in land because they find a sort of safety & security in such investments. The class of peasants is dwindling into a people of pure labourers on land. The exploiting of land goes on a meagre scale and there are no orgained efforts to take the place of the individual efforts of the sinking peasantry. A bad system of letting out land at a certain multiple of the land-revenue has come in vogue; and middlemen who have become owners of land have made it a matter of speculation which is so popular amongst the peasant—labourers, of the day. The soil has lost much of its fertility owing to the continuous cultivation for over a generation. The present growth of crops shows that those crops are raised which yield the earliest harvest at the least cost. The rotation between Rabbi and Kharip crops is almost a matter of history. This leads to the further deterioration of the soil. Besides the increase in the land—tax has made agriculture a less profitable profession but the want of other openings in industries and commerce has still retained on agriculture a crowd of people who can hardly fare to earn a full day's meal all the year round upon it.

This decay is due to the loss of Indian industries. India is passing through an economic revolution. India is not one nationity. Indian of the rulers is not the India of her native people. One side of India is destructive to the continuance of the other. India is materially progressing. This is true when we know that our rulers are getting prosperous over the complete and successful exploitation of the country. Here is a nice observrtion which differentiates one phase of India from that of the other—

" Then we are told, as Lord Curzon has already told us, that India is " on the threshold of a period of rapid material development. " We do not know whether we are to rejoice or to grieve over such a prospect. For, there are two Indias— the India of the whiteman and the India of the blackman. A "rapid material development" may mean a rapid acquisition of wealth by the European capitalist who contributes to such development, but for the Indian it means additional drain and exhaustion of mineral resources. The India of the whiteman may indeed be on the threshold of a period of rapid development, but it does not necessarily follow that the Indians have any reason to congratulate themselves on such a prospect. "

Indian industries and Indian capital require a protective hand. They have to gain and maintain their ground against the British policy of securing the English industry and the English capital at any cost to India. We see the beginnings of a patriotic feeling in our midst. There is a stiking preference to country products. Foreign imports come to be an in our industrial development. What we want from our rulers is introduction of technical education in our schools. Let there be this education as cheap and popular as possible and we are sure that matters will take a different and favourable turn.

## वऱ्हाडवृत्त

सुट्टी--पालावाद प्रमाणें या हप्त्यांत दीपवाळीच्या आनंदोत्सवा निमित्त आमच्या कारखान्याचें काम बंद राहील आणि त्यामुळें ता० २६ आक्टोबरचा अंक प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं.

हवामान— आकाशांत ढग पुष्कळदां येतात. कोठें कोठें पाऊसही पडला. हवा निरोगी नाहीं. दव पडत नसल्य मुळें पीकांचा परिपोष नीट होत नाहीं.

या आठवड्यांत आकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे.

डक्टर स्वेन सानिटरी कमिशनर हे आपल्या कामाचा चार्ज मध्य प्रांताच्या सानिटरी कमिशनराकडे देऊन ते नागपुरास सिव्हील सर्जनच्या जागीं जातील.

रा. रा. कुकहलांड साहेब इनस्पेक्टर जनरल मध्य प्रांत हे या प्रांताच्या इनस्पेक्टर जनरलीचा चार्ज घेतील आणि कर्नल वारन हेस्टिंग हे डेपुटी कमिशनर होऊन इलिचपूर जिल्ह्याला जातील.

इलिचपुराहून मेजर आर. पी. कोलंब साहेब हे वाशिमास डेपुटी कमिशनर होऊन मि. प्रीडो साहेब असिस्टंट कमिशनर होणार होते, पण काहीं महिन्यासाठीं हे तिकडे न जातां आकोल्यास डेपुटी कमिशनर होणार आहेत.

आमचे डेपुटी कमिशनर रा. रा. रूस्तुमजी फर्दूनजी साहेब यांस या प्रांताच्या भावी व्यवस्थे संबंधानें बसणाऱ्या स्पेशल कमिटींत सभासद नेमणार असल्यामुळें मेजर कोलंब साहेब आकोल्यास येतील.

मे. हेअर साहेब कमिशनर यांच्या चाकरीची मुदत डिसेंबर अखेर पर्यंत होती ती एप्रिल पर्यंत वाढविण्यांत येणार आहे. यांचा सल्ला भावी कारभाराला चांगला मार्गदर्शक होईल.

सानिटरी कमिशनर व इन्स्पेक्टर जनरल यांच्या आफिसांतील बऱ्याच जागा खालीं करण्यात येणार आहेत.

हल्लींचे कमिशनर हे वऱ्हाडचे सब-डिव्हीजनल कमिशनर ह्मणून होतील तेव्हां त्यांच्या आफिसाची व लांड रिकार्डाच्या आफिसाची पुष्कळच छाटाछाट होणार आहे.

चार जिल्हे—वऱ्हाडचे तीन जिल्हे करणार असल्या विषयीं बातमी होत पण तीन जिल्हे न करितां चार जिल्हे करणार असल्या विषयीं ताजी बातमी आहे.

परंतु या सर्व वाटाघाटी स्पेशल—कमिटीच्या विचारानें व्हावयाच्या आहेत आणि त्या कमिटींत मध्य प्रांताचे कांहीं आफिसर असून आमचे डिपुटी कमिशनर रा० रा० रुस्तुमजी साहेब हेही एक सभासद होणार आहेत हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

प्रयाण— नामदार चीफ कमिशनर साहेब यांची स्वारी काल रात्रीं दोनप्रहरच्या गाडीनें मलकापुरास गेली.

लोणारकर यांनीं ' लोणार वर्णना ' चें पुस्तक पाठविलें आहे त्याजबद्दल आह्मी ह्यांचे आभार मानतों.

' धर्म ' रा० रा० काशीनाथ वामन लेले वाईकर यांनीं आपलें १६ पृष्ठांचें साप्ताहिक पत्र सुरू केलें आहे. त्याचे तीन अंक पोचले.

' महाराष्ट्र कवि '— ' काव्यसंग्रहा ' ला जोडीदार ह्मणून एक दुसरें साह्यकारी मासिक पुस्तक ठाण्याच्या ' मराठी ग्रंथ संग्रहालया ' च्या आश्रयाखालीं गेल्या विजयादशमी पासून सुरूं झालें आहे. पहिल्या अंकांत श्रीधरस्वामी, रंगनाथस्वामी, जयराम स्वामी व नागेश कवी या संत कवींच्या चार पृथक् काव्याला प्रारंभ करण्यांत आला आहे. वर्गणी टपालहांशिलासह १८६.

मुलाखती—गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं नामदार साहेबांनीं येथील ठळक अधिकारी व ठळक ठळक गृहस्थ यांच्या भेटी घेतल्या त्यांस वेळ थोडा असल्यामुळें एकएकाची भेट ५।१० पळांत झाली.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १०० |
| सोनें २४॥ | | चांदी ७३। |
| जवारी २५।३०।३५।४० | | जवस ८८ |
| गहू | | ७५ ते ९५ |
| बाजरी | | ४५ |
| मीठ | ४।≈ | रु. मण |
| चणे | ३≈ | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ५ | रु. मण |
| रुई | | ५० |

कि. दिवाणी दावा नंबर ९ क्लास २१ / १९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां माजला कर्ज वसूल करण्याबद्दल सर्टिफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर सन १८८९ यतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान गोपाळ वामन बापट साहेब बहादूर सिव्हील जडज्य आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार गोदूबाई नवजे मुकुंदराव येशवंत नाळे वस्ती आकोला.

सर्वांस या नोटीशीनें कळविण्यात येतें कीं वरील अर्जदार यानें मयत मकुंदराव येशवंतराव यानें ओरियनटल गव्हरमेंट सिक्युरीटी. लाईफ. इनसुरन्स कंपनी कडेस पौलीसी नंबर ३३९३ रकम रुपये १००० एक हजाराची घेतली त्याचे रुपये एक हजार १००० वसूल करण्या करितां सर्टिफिकीट मिळावें ह्मणून तारीख ८ माहे आक्टोबर सन १९०३ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख ७ माहे नव्हेंबर सन १९०३ इसवी रोजीं मुकरर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरेसुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सर्टिफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्याकरितां हजर व्हावें. माझे सहीनिशीव कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख १५ माहे आक्टोबर सन १९०३

G. W. Bapat.
सिव्हिल ज डज्य

### NOTICE

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters of Ward No. II prepared by the Secretary under rule 6 of the Berar Municipal Election Rules, are posted as required by rule 7, at the following places.

Persons entitled to vote under rule 3 are requested to see if their names are included in the lists posted and make complaints if there be any under rule 8 and if they are entitled to vote in two wards under section 5. to choose the ward in which they wish to vote, before the 25th of October 1903. The names of the places where the lists are posted are as follows:—

1 The Deputy Commissioner's Office.
2 Small Cause Court.
3 The Tahsili.
4 The Chawree.
5 The Police Station in the town.
6 The Cotton Market Office.
7 The Grain Market Office.
8 The Morna River bridge.
9 The Town Hall.

Dated Akola 15-10-1903 } W. L. Chiplonkar, Secretary, Municipal Committee Akola

## जाहिरात

ह्या नोटिशीनें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुनिसिपल सेक्रेटरीनीं निवडणुकी संबंधाचे ६ वे नियमा प्रमाणें वार्ड नंबर २ चे मत देणारे लोकांची यादी तयार करून नियम ७ प्रमाणें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं तिच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्यांना मत्त देण्याचा अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येते कीं, त्यांनीं आपली नांवें सदर्हू यादींत दाखल आहेत किंवा नाहींत हें पाहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती व ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्यांनीं आपण कोणत्या वार्डांत मत देणार हें तारीख २५।१०। १९०३ इसवीचे आंत कळवावें.

१ मे० डेपुटी कमिशनर साहेब यांची कचेरी.
२ स्माल कान कोर्ट.
३ तहशिल कचेरी.
४ कॉटन मार्केट.
५ धान्य मार्केट.
६ चावडी.
७ पोलिस स्टेशन.
८ लोखंडी पूल.
९ टौन हाल.

ता० १५।१०।०३ इसवी. } Wasudeo L. Chiplonkar, सेक्रेटरी, म्यु. क. आकोला

हिंदुस्थानची हीन स्थिती—हिंदुस्थांतील दर माणशीं उत्पन्न २० पासून २७ रु. पर्यंत आहे; पण कैद्यांचा खर्च सुद्धां ३६ रुपये असतो. यावरून हिंदुस्थानांतील लोकांची स्थिती कैद्याहून हीन आहे, हें सरकारी रिपोर्टानें प्रसिद्ध होतें.

कापसाचा दुष्काळ पडल्यामुळें लोकास मजूर लोकांची विपत्ती फार वाढली असून हजारो लोक उपाशीं मरत आहेत, असें प्रसिद्ध झालें आहे.

गेल्या गुरुवारीं मुंबई येथें शेट भगवानदास माधवदास यांचे बंगल्यावर ब्राह्मण जातीचा पुनर्विवाह झाला. वर हुबळीचे रा० रा० केशव परशराम कुलेगंड हे होते. वराचें वय २६ वर्षांचें आहे, वधू यमुनाबाई इचें वय २० वर्षांचें आहे.

आंत्रोळी केशवरनाचे खटल्याची चौकशी सोलापूर सेशनमध्यें सुरू झाली.

नामदार गव्हरनर साहेबांची स्वारी येत्या बारा तारखेस सोलापुरास जावयाची आहे त्यांचे कानीं आपली गाऱ्हाणीं घालावीं अशी कल्पतरु कर्त्यांनीं सूचना केली आहे.

गेल्या तीन तारखेस सकाळीं सुमारें अडीच तासपर्यंत आकाशातून सारखें टोळांचें छत होऊन गेलें होतें. हे टोळ पूर्वेकडून पश्चिमेकडे जात होते. यंदा पाऊस वेळेवर पडून पिकें चांगलीं आलीं आहेत, परंतु टोळधाडीची भीति लोकांस वाटू लागली आहे!

ठाणें येथील जमादारांच्या वरच्या वर्गाच्या पोलीस कामदारांनीं एक सोशल क्लब स्थापला आहे.

"राणी" नांवाच्या आगबोटींतून कराचीहून बर्बेराकडे उंट पाठविण्यांत येणार आहेत.

सोफिया येथें अशी खबर आली आहे कीं रासलाग येथील ख्रिश्चन लोकांची भर रस्त्यांत कत्तल करण्यांत आली. फक्त १० लोक उरले आहेत.

यंदाच्या सिव्हिल सर्व्हिस परीक्षें, मुंबईतील मि० हमीद माझुद्दीन हे तरुण मुसलमान गृहस्थ पास झाले.

कोरियाच्या अंगास जपानी फौज जमा होऊं लागली असून त्या संबंधानें जपानीं लष्करी खात्यांत फार घाईनें तयारी चालली आहे!

प्लेगनें आजारी पडलेल्या माणसास कार्बालिक आसिडचे भरपूर डोस दिले म्हणजे बहुतकरून तो मनुष्य वांचतो असा हाँगकाँग मधील एका डाक्तरास अनुभव आल्याचें कळतें.

इंग्रज साम्राज्याचें वार्षिक उत्पन्न ३ अब्ज १० कोटी पौंड असून, त्यांतील सर्व लोकांची सर्व संपत्ती २ खर्व २ अब्ज २६ कोटी पौंड आहे! एकंदर ग्रंथकर्त्यांचें वार्षिक उत्पन्न ५० लक्ष पौंड आहे, असें एका अंकशास्त्रज्ञानें प्रसिद्ध केलें आहे.

गेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर कल्याणास 'आयच्छत्राश्रम' नावाची एक बोर्डिंग प्रमाणें संस्था स्थापन झाली आहे. ही संस्था सुरू करण्याचा समारंभ त्या दिवशीं डा० नाना साहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. या संस्थेंत जरूर तें आलीकडील शिक्षण देऊन, शिवाय धर्मशिक्षणही देण्यांत येणार आहे.

झांशीच्या असि. स्टेशन मास्तरच्या एका चाकरानें स्टेशन मास्तरच्या बायकोपाशीं अ पल्या पगारांतील ५ रुपये आगाऊ मागितले. ते त्या बाईनें त्यास दिले नाहींत म्हणून रागावून त्या माणसानें त्या बाईचा खून करण्याचा प्रयत्न केला. तिच्या किंकाळ्यामुळें सोडविण्यास धावून आलेल्या दुसऱ्या एका माणसासही त्यानें मारण्याचा प्रयत्न केला! दोघांसही पुष्कळ इजा झाली. आरोपी अटकेंत आहे. स्टेशन मास्तर यूरोपियन आहे.

बाराखपूर येथें मारहाण केल्याबद्दल डीकना नावाच्या एका माणसावर खटला होऊन ३०० रु. दंड किंवा १ महिना सक्त मजुरी अशी शिक्षा झाली.

मि. जान ब्रॉडरिक, हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाले मि. आस्टेन चेंबरलेन चान्सेलर आफ धी एक्सचेकर मि. आल्फ्रेड लिटलटन, वसाहतीचे स्टेट सेक्रेटरी मि. आरनोल्ड फास्टर, लढाईखात्याचे स्टेट सेक्रेटरी, आंड्रू ग्राहाम मरे. स्काटलंडचे सेक्रेटरी, लार्ड स्टानले; जनरल पोस्टमास्तर. अशा नेमणुका झाल्या.

बॉस्निको व मेल्नी या प्रांतांत झांटचेफ व यानकाफ हे बंडखोर सरदार आपल्या लोकांस सल्ला देत आहेत व ते प्रांत जिकडे तिकडे पेटले आहेत! तुर्क सांगतात कीं, २० गांव उध्वस्त करण्यांत आले असून बानिस्को प्रांतांतील २,००० तुर्क लोक मारले गेले आहेत! ठा० अ०

डेली मेलनें प्रसिद्ध केलेल्या बातमीवरून असें समजतें कीं तारीख ४ रोजीं रशियाच्या वकिलानें जपानला असा खलिता पाठविला आहे कीं, मांचूरियामध्यें ढवळाढवळ करण्याला जपानला अधिकार नाहीं. कोरियाची वांटणी केली तर जपाननें दक्षिणकडील भाग घ्यावा असें रशियाच्या वकीलाचें मत आहे.

जपाननें ता० ६ रोजीं याचा जबाब दिला व रशियाच्या सूचना नाकबूल केल्या.

मद्रासची सामाजिक परिषद—ही परिषद यंदा भरवावी कीं नाहीं, याचा विचार करण्यासाठीं मद्रास येथें तेथील पुढाऱ्यांची सभा भरली होती. त्या वेळीं तेथील प्रेसिडेंसी कालेजांतील प्रो. रंगाचारियर म्हणाले:— 'सामाजिक परिषदेचें एकंदर धोरण बंडखोरपणाचें असून त्याचेमध्यें तडजोडीची बुद्धी मुळींच नसल्यामुळें ती लोकांस अप्रिय झाली आहे. शिवाय तिचीं मतें समाजाच्या दृढ कल्पना व त्याच्या मनोवृत्ति यास दुखविण्यासारख्या असून, ते लोक त्यांच्या धार्मिक व सामाजिक अत्युच्च कल्पनांवर विनाकारण व निष्ठुरपणानें हल्ला करतात. समाजाचें सामान्य हित न पाहतां आपलीं सुधारलेलीं मतें तावडतोब व्यक्तिशः अंमलांत आणूं पाहतात, हेंही तिच्या अप्रियतेचें कारण आहे.' दुसरा एक गृहस्थ असें म्हणाला कीं, परिषद राष्ट्रीय सभेचें अनुकरण करून नुसती बडबड व वादविवाद मात्र करते व काम मात्र कांहीं करीत नाहीं. मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर यांनीं सभेचें व तिच्या पद्धतीचें समर्थन केलें. या बाबतींत यंदा काय करावयाचें हें ठरविण्यासाठीं तेथें लवकरच जाहीरसभा भरणार आहे.

अमृतसरकडे एक तरुण बाई बरोबर कोणी न घेतां आपल्या नवऱ्याकडे जात होती. हेंच अमृतसर स्टेशन, असें सांगून तिला एका युरेजियन टिकिट कलेक्टरानें उतरून घेतलें, व फसवून तिला आपल्या बिऱ्हाडीं नेऊन तिजवर बळजबरी केली; व पाहाटे तिला आणून प्लाटफार्मवर सोडून तो तिकिट न देतां चालता झाला. हल्लीं त्यावर खटला चालला आहे.

बराकपूरचा मि. डी कुन्हा यानें एका पंखाकुलीला हुकूम न ऐकल्याबद्दल लाथ मारली; तेव्हां तो पळून जाऊं लागला; परंतु पाय निसरून तो पडला व त्याची फुगलेली प्लीहा फुटून तो मरण पावला', असें म्हणतात! याबद्दल खटला होऊन तेथील कँटानमेंट माजिस्ट्रेटानें साधा दुखापतीचा आरोप शाबीत ठरवून त्यास ३०० रु० दंड व तो न दिल्यास १ महिना सक्त मजुरीची शिक्षा दिली!

१० तारखेचे आधीं तीन दिवस आग्रा शहरातही सूर्यदर्शन झालें नाहीं, सारखा मुसळधार पाऊस पडत होता. त्यानें पिकांची फार नासाडी होऊन शेंकडों घरें कोसळून पडलीं, जगप्रसिद्ध ताजमहालावरही सृष्टिकोपाचा परिणाम होऊन शहाजहान व मुमताज याचे थडग्यांचे वरचे बाजूस मुख्य घुमटावर मोठी भेग पडून पावसाचें पाणी आंत गळूं लागलें!!

गेल्याचे मागील शनवारीं जुनागडास अतोनात पाऊस पडला. तेथील बहाद्दीन कॉलेजचे इमारतीवर वीज पडली; ती एका खिडकींतून आंत शिरून दुसरींतून निघून गेली! दोन मुलांस धक्का बसून कडेच्या भिंतीला मोठी भेग पडली.

गेल्या शुक्रवारीं ठाण्याचे तुरुंगांतील सुर्जु मोची नांवाच्या कैद्यानें जेलर मि. डी—आल्मीडा याजवर हल्ला करून, कातड्यास भोंकें पाडण्याचे आरीनें त्याचे डोक्यावर इतक्या जखमा केल्या कीं, ते तत्काळ तेथें बेशुद्ध पडले.

पेनशनर रा. ब. मरूतराव भुजंगराव पालणपूरवाला यांनीं नगरांतील कोष्टी लोकांत इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचे हेतूनें त्या जातींतील मुलांस स्कालरशिप देण्यासाठीं ५००० रु. च्या प्रा. नोटा वेगळ्या काढून तेथील म्यु. चे हवाली केल्या आहेत.

एका दिवसाच्या गैरहजिरीबद्दल म्यानेजरानें दोन दिवसांचा पगार कापल्याबद्दल मुंबईतील मुरारजी गोकुळदास गिरणींतील २०० मजुरांनीं संप केला होता.

तिबेटी सरहद्दीवर जाऊन बसलेल्या यंगहजबंड कमिशनास सिक्किमपासून रसद पोंहोंचविण्याची सोय व्हावी म्हणून ६०० कारागीर तट्टांचें व हिमालयांतील लोकांचें एक कोर तयार झालें आहे. हें कमिशन खंबागंज येथें स्वस्थपणें तिबेटी व चिनी अधिकाऱ्यांची वाट पहात आहे.

कलकत्त्याच्या महाराणीसाहेबांचे राष्ट्रीय स्मारकासाठीं आणखी १॥ लक्ष रुपयांची देणगी देण्यास म्हैसूरच्या पुढील सालच्या बजेटांत मंजुरी दिली आहे.

'शिको' प्रकरण व रंगूनांतील विद्यार्थ्यांचा संप यांचा असा एक इष्ट परिणाम होणार आहे कीं, अलिगडच्या मुसलमानी कॉलेजाप्रमाणें रंगूनास एक बौद्ध कॉलेज स्थापन करण्याचा तिकडील पुढाऱ्यांत विचार चालला असून याचे फंडासाठीं सूचना करणारानें आरंभीं ५००० रु देऊं केले आहेत!

आपल्या आफिसांत सब प्रोटेम व अक्टिंग १९ रु. च्या कारकुनांच्या जागा रिकाम्या आहेत, त्यासाठीं तेलगू भाषा जाणणाऱ्या ग्राजुएटांनीं अर्ज करावें, अशी जाहिरात नेलोरच्या कलेक्टरानें वर्तमानपत्रांत दिली आहे!

क्वेटा येथें नुकताच एक दरबार भरला होता, व त्यांत सर्ववर्गाचे लोक जमले होते. त्यावेळीं तेथील एजंट कर्नल येट यांनीं भाषण केलें. 'सोमाली युद्धासाठीं उंट पुरविण्याविषयीं इंग्रजसरकारानें कळविलें असतां बलुची सरदारांनीं एकही उंट दिला नाहीं, ह्याबद्दल मला फार नाखुषी वाटते; तथापि बलुची जातींना एडवर्ड राजाचे शिपाई होण्यास सरदारांनीं उत्तेजन द्यावें.' असें म्हणून दिल्ली दरबारास आलेल्या ३० बलुची सरदारांस सोन्यरुप्याचीं पदकें, सनदा, पदव्या, सर्टिफिकीटें व पोषाख दिले.

नव्या पोपनें आपलें पहिलें आज्ञापत्र प्रसिद्ध केलें आहे; त्यांत तो म्हणतो:— 'पृथ्वीवर येशू ख्रिस्ताचें साम्राज्य पुनः स्थापन करणें, येवढाच माझा उद्देश व येवढेंच माझें काम आहे.'

सन १८७०–७१ सालीं पारिस शहरास जर्मन सैन्याचा वेढा पडला असतां बाहेरील बातमी आत व आंतील बाहेर पत्राचे रूपानें आणणाऱ्या कबूतरांचें स्मारक करण्याचा पारिसांत विचार चालला आहे! चार खांबांवर एक ढाल देऊन त्यावर एक कबूतर बसलें आहे, एक खालीं घरट्यांत बसलें आहे व एक गोळी लागून पडलें आहे, असे कबूतरांचे संगमरवरी पुतळे मांडावयाचे आहेत.

प्रे. रूजवेल्टच्या व्हाइटहौस वाड्यात आणखी एक हत्यारबंद वेडा त्यांचा खून करण्यासाठीं लपून बसलेला सांपडला! शिपाई व त्याचा बरीच झटापट झाल्यानंतर त्यास पकडण्यांत आलें. ब्रिटिश वकील सर हर्बर्ट याच्या प्रेतयात्रेच्या निमित्त होणाऱ्या प्रार्थनेचे वेळीं प्रेसिडेंट हजर राहिले होते; यांच्या संरक्षणाचा त्या वेळीं विशेष कडेकोट बंदोबस्त केला होता.

बलुचिस्थानांत 'सनातन धर्मसभा सन १८९९ सालीं स्थापित झाली तेव्हांपासून दिवसें दिवस तिची भरभराट होत आहे व तिणें धर्मालयाप्रीत्यर्थ वगैरे आजवर ३० हजार रुपये खर्च केले. वार्षिक उत्सवाच्यावेळीं तेथें मोठ्या थाटानें मिरवणूक निघते. या संस्थेस पंजाबी, सिंधी व मराठी, यांची सहानुभूति आहे.